## अखेर मान्सूनचे केरळात आगमन; नागरिकांना दिलासा



**पुणे :** मान्सूनचे सात दिवस उशिराने केरळात आगमन झाले आहे. दक्षिण तामिळनाडू आणि केरळचा बराचसा भाग मान्सूनने गुरुवारी (दि. ८) व्यापला आहे, अशी माहिती भारतीय हवामानशास्त्र विभागाने जाहीर केले. केरळात मान्सून दाखल झाले असून देशात मान्सूनच्या पुढील वाटचालीस आता सुरुवात झाली आहे. पुढील ४८ तासांत संपूर्ण केरळसह तामिळनाडू, कर्नाटक, अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागराच्या आणखीन काही भागात मान्सून प्रगती करेल, असे हवामानशास्त्र विभागाने नमूद केले आहे. बिपोरजॉय या चक्रीवादळाचा मान्सूनच्या तीव्रतेवर परिणाम होत असून केरळमध्ये झालेली पावसाची सुरुवात सौम्य आहे, असे हवामान तज्ज्ञांचे म्हणणे आहे.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १५ ◆ अंक ३२१

www.ramprahar.com

शुक्रवार, ९ जून २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


## अंतरंग


कर्जाची परतफेड करण्यासाठी मंदिरातील देव पळवले/२

धाटावच्या कंपनीतील आग दुसऱ्या दिवशीही धुमसतेय/५

'भाजपसाठी ज्येष्ठ कार्यकर्त्यांचे योगदान अमूल्य'/६




### अलिबागमध्ये लाभार्थींचा भव्य मेळावा

# पंतप्रधान नरेंद्र मोदींमुळे भारत बलाढ्य बनतोय

## भाजप क्लस्टर संयोजक संजय टंडन यांचे प्रतिपादन



**अलिबाग : प्रतिनिधी**

भारत पूर्वी मागणारा देश होता. आता मात्र भारत देणारा देश बनलायाय. अनेक देश आता भारताकडे आशेने पाहत असतात. आपला देश आता बदलतोय. भारत एक शक्ती म्हणून जगात पुढे येत आहे. हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वामुळेच घडले आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र भाजप क्लस्टर संयोजक संजय टंडन यांनी केले.

मोदी @ ९ अभियानांतर्गत भारतीय जनता पक्ष दक्षिण रायगडतर्फे केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांच्या लाभार्थींचा भव्य मेळावा गुरुवारी (दि. ८) अलिबागजवळील वरसोली येथील होरिझॉन सभागृहात आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी संजय टंडन बोलत होते.

भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमादार प्रशांत ठाकूर, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष अतुल काळसेकर, माजी आमदार धैर्यशील पाटील, अविनाश कोळी, मिलिंद पाटील, राजेश मापारा, **(पान २ वर..)**

### प्रत्येकाला लाभार्थी बनवू -आमदार प्रशांत ठाकूर

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सामान्यांचा विचार करून या योजना राबविल्या.त्याची माहिती गावागावांमध्ये जाऊन देऊ. अलिबाग-मुरुड विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक व्यक्ती केंद्र सरकारच्या योजनेचा लाभार्थी बनवू, असे आश्वासन आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिले.

### योजनेमागची भावना महत्त्वाची -धैर्यशील पाटील

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या जनधन योजनेमुळे सर्वसामान्य व्यक्तीचे बँकेत खाते उघडले गेले. त्यामुळे शासनाच्या योजनेचा निधी थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जाम होऊ लागला. मधले कमिशन बंद झाले. योजनेमागची भावना, प्रेरणा महत्त्वाची असते, असे माजी आमदार धैर्यशील पाटील म्हणाले.

# भाजपचे मिशन २०२४

## आगामी निवडणुकांसाठी निवडणूक प्रमुख जाहीर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पुढील वर्षी होणाऱ्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांसाठी भारतीय जनता पक्षाने लोकसभेच्या ४८ आणि विधानसभेच्या २८८ मतदारसंघांसाठी निवडणूक प्रमुखांची घोषणा गुरुवारी (दि. ८) केली आहे. यामध्ये मावळ लोकसभा मतदारसंघाची धुरा भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. त्याचप्रमाणे विधानसभा मतदारसंघात उरणसाठी भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरूणशेठ भगत, पनवेलसाठी भाजपचे रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील तर अलिबागसाठी दक्षिण रायगड उपाध्यक्ष दिलीप भोईर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

भाजप- शिवसेना युतीने लोकसभेच्या ४५ आणि विधानसभेच्या २००पेक्षा अधिक जागा जिंकण्याचा निर्धार केला आहे, असे भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले. भाजप प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत महाविजय अभियान २४चे प्रदेश संयोजक आमदार श्रीकांत भारतीय, महाजनसंपर्क अभियानाचे प्रदेश संयोजक आमदार प्रवीण दरेकर, प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, विक्रांत पाटील, मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी उपस्थित होते.



**मोदी सरकारच्या नवव्या वर्षपूर्तीनिमित्त भाजपातर्फे सध्या सुरू असलेल्या महाजनसंपर्क अभियानात नांदेड येथे १० जून रोजी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची सभा होणार आहे. राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांचीही राज्यात सभा होणार आहे. या अभियानात मोदी सरकारची कामगिरी सामान्य माणसापर्यंत पोहचविली जाणार आहे. या अभियानासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सभा व्हावी, यासाठी प्रयत्न चालू आहेत.**

**-चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेशाध्यक्ष, भाजप**

बावनकुळे यांनी सांगितले की, भाजपने नियुक्त केलेले निवडणूक प्रमुख भाजपबरोबरच शिवसेनेच्या उमेदवारांनाही सहकार्य करणार आहेत. आगामी सर्व निवडणुका युतीत लढविणार असल्याने आमचे निवडणूक प्रमुख शिवसेनेसाठीही काम करणार आहेत. मोदी सरकारच्या नवव्या वर्षपूर्तीनिमित्त भाजपातर्फे सध्या सुरु असलेल्या महाजनसंपर्क अभियानात नांदेड येथे १० जून रोजी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची सभा होणार आहे. राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांचीही राज्यात सभा होणार आहे. या अभियानात मोदी सरकारची कामगिरी सामान्य माणसापर्यंत पोहचविली जाणार आहे. या अभियानासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सभा व्हावी यासाठी प्रयत्न सुरू आहेत. या अभियानात घरोघरी जाऊन मोदी सरकार आणि शिंदे-फडणवीस सरकारच्या कामगिरीची माहिती देणारी पुस्तिका वितरित केली जाणार आहे. या अभियानाच्या माध्यमातून तीन कोटी कुटुंबांपर्यंत पक्षाचे कार्यकर्ते पोहचणार आहेत. याच अभियानात टिफिन बैठकांच्या माध्यमातून कार्यकर्त्यांशी संवाद साधला जात आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काल नागपूर येथे व आपण अक्कलकोट येथे टिफिन बैठकीला उपस्थित होतो, असेही बावनकुळे यांनी नमूद केले.

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडे मावळ लोकसभा मतदारसंघाची धुरा



या वेळी त्यांनी मावळ लोकसभा मतदारसंघासाठी रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, बारामती लोकसभा मतदारसंघासाठी आ. राहुल कुल, पुण्यासाठी मुरलीधर मोहोळ, मुंबई उत्तरसाठी आमदार योगेश सागर आदींची निवडणूक प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आल्याचे जाहीर केले. त्याचप्रमाणे विधानसभा मतदारसंघात उरणसाठी भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरूणशेठ भगत, पनवेलसाठी भाजपचे रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील तर अलिबागसाठी दक्षिण रायगड उपाध्यक्ष दिलीप भोईर, कर्जतसाठी किरण ठाकरे, पेणसाठी प्रसाद भोईर, श्रीवर्धनसाठी प्रशांत शिंदे व महाडसाठी बिपीन म्हामूणकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## अनधिकृत शाळांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात

**पनवेल : प्रतिनिधी**

राजिपच्या शिक्षणाधिकारी यांनी पनवेल तालुक्यातील १० शाळा अनधिकृत जाहीर केल्याने तेथील प्रवेश घेतलेल्या हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात आले आहे. त्यांना दुसऱ्या शाळेत प्रवेश देण्याची व फी परत मिळवून देण्याची जबाबदारी कोणाची? आपल्या पाल्याच्या भविष्याच्या चिंतेमुळे शिक्षण खात्याला एवढ्या उशिरा का जाग आली, या शाळा जाहिरात करून प्रवेश देत असताना शिक्षण खाते काय करीत होते, असे प्रश्न पालक विचारीत आहेत.

आजच्या काळात शाळेत प्रवेश मिळणे अवघड असल्याने पालकांनीही हजारो रुपये फी भरून प्रवेश घेतले. त्या पालकांपुढे काय करायचे असा प्रश्न निर्माण झाला आहे. शिक्षण अधिकारी म्हणतात, प्रवेश रद्द करा, फी परत मागा, पण शाळा फी परत देणार नाही, पुन्हा दुसरीकडे प्रवेश मिळणे अवघड आहे. यामुळे पालकांची चिंता वाढली आहे. **(सविस्तर वृत्त पान ३ वर..)**

## राज्यातील २३८४ शिक्षकांतून केंद्रप्रमुखांच्या जागा भरणार

### अर्ज भरण्यास सुरुवात; महिनाअखेर ऑनलाईन परीक्षा

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने नुकतेच केंद्र प्रमुखांच्या रिक्त जागा भरणार असल्याचे जाहीर केले आहे. या वेळी राज्यातील ३४ जिल्ह्यांमध्ये दोन हजार ३८४ केंद्र प्रमुखांच्या रिक्त जागा भरल्या जाणार आहेत.

विशेष म्हणजे यासाठी ६ जूनपासून अर्ज भरण्यास सुरुवात झाली असून, महिन्याच्या अखेर ऑनलाईन परीक्षा घेण्यात येणार आहे. त्यामुळे आता छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये कार्यरत शिक्षकांनादेखील स्पर्धा परीक्षेद्वारे केंद्रप्रमुख होण्याची संधी मिळणार आहे.

केंद्रप्रमुखांची ५० टक्के पदे शिक्षकांमधून पदोन्नतीने भरली जातात, तसेच उर्वरित ५० टक्के पदे राज्य परीक्षा परिषदेच्या माध्यमातून केंद्रप्रमुख विभागीय मर्यादित स्पर्धा परीक्षा २०२३द्वारे भरण्यात येणार आहेत. जि. प. शिक्षकांना पदोन्नतीची संधी मिळाल्यामुळे अनेकांनी तयारी सुरू केली आहे. त्यामुळे आपल्यालादेखील केंद्रप्रमुखपद मिळावे, अशी अपेक्षा अनेक शिक्षकांची आहे.

#### कोणत्या जिल्ह्यात किती जागा?

नाशिक १२२, नंदुरबार ३३, धुळे ४०, जळगाव ८०, अमरावती ६९, बुलढाणा ६५, अकोला ४२, वाशिम ३५, यवतमाळ ९०, नागपूर ६८, वर्धा ४३, भंडारा ३०, गोंदिया ४२, गडचिरोली ५०, चंद्रपूर ६६, छत्रपती संभाजीनगर ६४, हिंगोली ३४, परभणी ४३, जालना ५३, बीड ७८, लातूर ५०, धाराशिव ४०, नांदेड ८७, ठाणे ४७, रायगड ११४, पालघर ७५, पुणे १५३, अहमदनगर १२३, सोलापूर ९९, कोल्हापूर ८५, सांगली ६७, सातारा १११, रत्नागिरी १२५ आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात ६१ जागांवर केंद्रप्रमुख भरले जाणार आहे.

## मीरा रोडमध्ये श्रद्धा वालकर हत्याकांडाची पुनरावृत्ती

**मुंबई : प्रतिनिधी**

दिल्लीतल्या श्रद्धा वालकर हत्याकांडामुळे संपूर्ण देश हादरला होता. त्या घटनेला काही महिने उलटत नाहीत तोच मुंबईतल्या मीरा रोड येथे अशीच घटना उघडकीला आली आहे. येथील मनोज सानेने त्याच्या लिव्ह इन पार्टनरची हत्या केली. पोलिसांनी त्याला अटक केली असून न्यायालयाने आरोपी मनोज सानेला १६ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

हत्येनंतर त्याने लाकूड कापण्याच्या मशीनने तिच्या मृतदेहाचे तुकडे केले. त्यानंतर हे तुकडे कुकरमध्ये शिजवून, मिक्सरमध्ये बारीक करून त्यांची विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न केला. शेजाऱ्यांना त्याच्या घरातून दुर्गंधी येऊ लागल्याने त्यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली. त्यानंतर हा सगळा प्रकार उघडकीस आला.

मनोज सानेच्या शेजारी राहणाऱ्या सोमेश श्रीवास्तव यांनी पोलिसांकडे तक्रार केली होती. त्यानंतर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. फ्लॅटमध्ये महिलेचे पाय, घरातील एका बादलीत आणि पातेल्यात महिलेचे धड आणि शीर यांचे तुकडे होते. **(पान २ वर..)**

## गाडी लावण्याच्या भांडणातून पेणमध्ये एकाचा मृत्यू

### संतप्त जमावाकडून दुकानाची तोडफोड

**पेण : प्रतिनिधी**

पेणमधील नाक्यावर दुकानासमोर गाडी लावण्याच्या वादातून झालेल्या किरकोळ भांडणात एकाच मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी (दि. ८) घडली. यानंतर आदिवासीवाडीवरील संतप्त जमावाने दुकानाची तोडफोड केली. या घटनेनंतर परिसरातील वातावरण काही काळ तंग झाले होते.

याबाबत माहिती अशी की, रोहन संतोष पवार (वय २६, रा. कामार्ली आदिवासीवाडी) हा गुरुवारी दुपारी केटीएम बाईक नाक्यावरील नारळाच्या दुकानासमोर लावीत असताना दुकानदार बांदिवडेकर याने त्याला हटकले व दुकानासमोर गाडी लावू नको असे सांगितले. यातून दोघांमध्ये बाचाबाची होऊन रोहन पवार रस्त्यावर पडला. त्याला दवाखान्यात नेले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

थोड्या वेळाने मृत रोहन पवारचे नातेवाईक व गावातील नागरिकांनी मोठ्या



संख्येने दवाखान्याजवळ गर्दी केली. काही नागरिकांनी पोलीस स्थानकात धाव घेत आरोपीला अटक करून शिक्षा करण्याची मागणी केली. आदिवासीवाडीवरील संतप्त जमावाने बांदिवडेकर यांच्या दुकानाचीही तोडफोड केली. पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ व त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत जमावाला पांगविले.

सायंकाळी उशिरा पेण पोलीस ठाण्यात आरोपीविरोधात कलम ३०२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ हे करीत आहेत. शांतात व सुव्यवस्था राखण्यासाठी ठिकठिकाणी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## रायगडातील विद्यार्थ्यांना पहिल्या दिवशी मिळणार पाठ्यपुस्तके



**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

समग्र शिक्षांतर्गत इ. पहिली ते आठवीमध्ये शिकणारे कोणतेही बालक पुस्तकांपासून वंचित राहू नये आणि पाठ्यपुस्तकाअभावी शिक्षणात अडथळा येऊ नये यासाठी शासनाने समग्र शिक्षांतर्गत मोफत पाठ्यपुस्तक ही योजना सुरू केली आहे.

या योजनेंतर्गत शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा आणि खासगी अनुदानित शाळांमध्ये शिकत असलेल्या एक लाख ८९ हजार २७४ विद्यार्थ्यांना सात लाख ८१ हजार ५६१ पाठ्यपुस्तके (एकात्मिक पुस्तक संच) शासनामार्फत मोफत पुरविण्यात येणार आहेत.

जिल्हा परिषद व नगरपालिका शाळा आणि खासगी अनुदानित शाळांमध्ये ज्या पालकांची मुले शिकत आहेत, त्यांनी आपल्या पाल्यांची पुस्तके बाजारातून खरेदी करु नयेत. ही पाठ्यपुस्तके सर्व पात्र शाळांमध्ये शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी उपलब्ध करुन दिली जातील, असे आवाहन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद पुनिता गुरव यांनी केले आहे.

## महामार्ग ओलांडताना कर्जतमध्ये मुलीचा मृत्यू

**कर्जत : प्रतिनिधी**

पळसदरी आदिवासीवाडी येथील १३ वर्षीय मुलगी घरी पाणी नेण्यासाठी येथील धरणावर गेली होती. डोक्यावरून पाण्याचा हंडा घेऊन राष्ट्रीय महामार्ग ओलांडत असताना चारचाकी वाहनाच्या धडकेत सारिका रामदास पारकर या मुलीचा मृत्यू झाला.

पळसदरी ग्रामपंचायतीमधील पळसदरी कातकरीवाडीतील सारिका रामदास पारकर (वय १३) ही पिण्याचे पाणी आणण्यासाठी डोंगर उतरून खाली आली होती. मंगळवारी सायंकाळच्या सुमारास ही मुलगी पळसदरी धरणावरून पाण्याचा हंडा डोक्यावर घेऊन शहापूर-मुरबाड-कर्जत-खोपोली हा राष्ट्रीय महामार्ग ओलांडत असताना तिला अज्ञात वाहनाने धडक दिली आणि ते वाहन पसार झाले. गंभीर जखमी झालेल्या मुलीला उल्हासनगर येथील मध्यवर्ती रुग्णालयात उपराचासाठी दाखल करण्यात आले, मात्र तेथे उपचार घेत असताना तिचा मृत्यू झाला.

### पनवेल मनपा नगर पथविक्रेता समिती निवडणूक निकाल जाहीर

## भाजपप्रणित पॅनेलचा विजय

**पनवेल : प्रतिनिधी**

दिनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियानांतर्गत फेरीवाल्यांना सहाय्य या घटकांतर्गत पनवेल महापालिकेच्या नगर पथविक्रेता समितीच्या २०२३-२४साठी निवडणुकीचा निकाल गुरुवारी (दि. ८) आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात जाहीर करण्यात आला.



या निवडणुकीमध्ये माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली व माजी नगरसेविका दर्शना भोईर, माजी नगरसेवक निलेश बाविस्कर, प्रदीप भगत व गोपाळ भगत यांच्या नेतृत्वाखाली पॅनेलने विजय मिळविला. सर्व विजयी उमेदवारांचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन केले.

इतर मागास प्रवर्गामध्ये प्रतिक्षा माळी, विकलांग महिला राखीव प्रवर्गामध्ये अंजू कोळी, सर्वसाधारण प्रवर्गामध्ये अनिकेत थोरात, मंगेश गोवारी, सर्वसाधारण महिला राखीव प्रवर्गामध्ये आशा मोरे विजयी झाल्या. अनुसूचित जाती प्रवर्गातून भिकाजी लोंढरे बिनविरोध निवडून आले.

आठ नगर पथविक्रेता सदस्यांसाठीची २०२३ ते २०२८करिताची पंचवार्षिक निवडणूक बुधवारी संबंधित चारही प्रभागामध्ये घेण्यात आली होती. या निवडणुकीसाठी १३ उमेदवारांनी निवडणूक लढवली. या निवडणुकीसाठी एकूण तीन हजार ७६ मतदार होते. या वेळी ५९.३० टक्के मतदान झाले. या निवडणुकीसाठी चार प्रभाग समिती अंतर्गत चार मतदान केंद्रावरती हे मतदान घेण्यात आले होते.

आठ सदस्यांपैकी एका अनुसूचित जाती पदासाठी एकच नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले असल्याने या प्रवर्गातील जागा बिनविरोध निवडून आली, तसेच अनूसुचित जमाती व अल्पसंख्यांक प्रवर्गासाठी एकही नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले नाही. त्यामुळे एकूण पाच प्रवर्गासाठी एकूण १३ उमेदवारांनी निवडणूक लढविली.

निवडून आलेल्या सर्व उमेदवारांना निवडणूक निर्णय अधिकारी शितल कुलकर्णी आणि नोडल अधिकारी उपायुक्त कैलास गावडे यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. आयुक्त गणेश देशमुख यांनी सर्व विजयी उमेदवारांचे अभिनंदन केले.

या निवडणुकीसाठी दिनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान विभागाचे विभाग प्रमुख हरेश जाधव, तांत्रिक अधिकारी विनया म्हात्रे, नवनाथ पवार, विभागातील सर्व कर्मचारी तसेच चारही प्रभागाचे प्रभाग अधिकारी यांनी अथक परिश्रम घेतले.

# वारकरी भवनसाठी अतिरिक्त १५ कोटी देणार -मुख्यमंत्री

## दिवा बेतवडे येथे आगरी-कोळी वारकरी भवनाचे भूमिपूजन

**ठाणे : प्रतिनिधी**

वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्राचे भूषण आहे. वारकऱ्यांसाठी दिव्यातील बेतवडे येथे उभारण्यात येणाऱ्या आगरी-कोळी वारकरी भवनसाठी आता १५ कोटी रुपये निधी देण्यात आला आहे. भवनच्या कामासाठी अतिरिक्त १५ कोटी रुपये देण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.



मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते दिवा शहरातील बेतवडे येथे ठाणे महापालिकेच्या वतीने उभारण्यात येणाऱ्या आगरी-कोळी वारकरी भवनाचे भूमिपूजन समारंभ झाला. त्या वेळी ते बोलत होते. या वेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, माजी महापौर नरेश म्हस्के, माजी उपमहापौर रमाकांत मढवी, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, आयुक्त अभिजित बांगर, वारकरी संप्रदायाचे जितेंद्र महाराज, चेतन महाराज घागरे, बाळकृष्ण महाजन पाटील, प्रकाश महाराज म्हात्रे, विनायक महाराज, जयेश महाराज भाग्यवंत यांच्यासह वारकरी, बेतवडे गावाचे नागरिक उपस्थित होते. वारकरी भवनसाठी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी विशेष प्रयत्न केले. महापालिकेमार्फत हे भवन उभारण्यात येणार असून यासाठी १५ कोटी रुपयांचा निधी देण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, वारकरी संप्रदाय कीर्तनाच्या माध्यमातून गावागावात समाज प्रबोधनाचे काम करत आहे. नागरिकांच्या प्रेमामुळे गेल्या वर्षी मला आषाढी वारीची पूजा करण्याचे भाग्य मिळाले. वारकऱ्यांची पंढरी असलेल्या पंढरपूर देवस्थानच्या सुशोभिकरण व इतर कामांसाठी व वारकऱ्यांची गैरसोय टाळण्यासाठी विशेष विकास आराखडा बनविण्यास राज्य शासनाने मान्यता दिली असून त्यासाठी ८३ कोटींचा निधी वर्गही केला आहे. पंढरपूर वारी मार्गावर आरोग्य तपासणी व इतर आरोग्यविषयक सुविधा पुरविण्याच्या सूचना आरोग्य विभागाला दिल्या आहेत. या वर्षीची आषाढी वारी ही मंगलमय, आनंददायी व सुखकारक होईल.

संत सावळाराम महाराज स्मारकासाठी जागा आणि निधी देण्यात येईल, तसेच आगरी कोळी वारकरी भवनला सावळाराम महाराजांचे नाव देण्याच्या मागणीचा सकारात्मक विचार करू असेही मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

पुरातन देवस्थानांचे जतन, संवर्धन व विकास करण्याचे काम राज्य सरकार करत आहे. सर्वसामान्यांच्या हिताचे निर्णय राज्य शासनामार्फत घेत आहोत. त्यामुळे महाराष्ट्र राज्य परदेशी गुंवतणुकीत देशात प्रथम क्रमांकावर आले आहे, असेही शिंदे यांनी सांगितले.

खासदार श्रीकांत शिंदे म्हणाले की, ठाणे, दिवा, कल्याण परिसरात आगरी-कोळी व वारकरी मोठ्या संख्येने राहतात. त्यांच्यासाठी हे भवन उभारण्यात येत असून आगरी-कोळी वारकरी भवन हे श्रद्धास्थान म्हणून ओळखले जाईल. येत्या वर्षभरात हे भव्यदिव्य वारकरी भवन उभे राहिल. या वास्तूत आगरी-कोळी संस्कृतीचे दर्शन घडेल. कल्याण येथे संत सावळाराम स्मारकासाठी जागा अंतिम झाली असून लवकरच त्याचे भूमिपूजन होईल.

# कर्ज परतफेडीसाठी मंदिरातील देव पळवले

## रेवदंडा मंदिर चोरीप्रकरणी मुद्देमालासह आरोपी जेरबंद

**अलिबाग, रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा येथील तीन मंदिरांमध्ये झालेल्या मूर्तींच्या चोरीप्रकरणी पोलिसांनी एकाला मुद्देमालासह अटक केली आहे. महेश चायनाखवा असे आरोपीचे नाव असून कर्जाची परतफेड करण्यासाठी त्याने चोऱ्या केल्याचे तपासात पुढे आले आहे.



१८ मे रोजी रेवदंडा थेरोंडा येथील खंडेराव पाड्यातील खंडोबा मंदिरातील देवदेवतांच्या चांदीच्या मूर्ती, टाक, लोलक, आगल्याची वाडी येथील मुंबईकर कुटुंबियांच्या कुलदेवतांच्या चांदीच्या मूर्ती, टाक, एकविरा देवीचा मुखवटा, तसेच ढोलके कुटुंबियांच्या कुलदेवतांच्या मूर्ती, टाक लोलक चोरीला गेले होते. चोरीच्या तपासासाठी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी रेवदंडा पोलिसांची दोन पथके तपासासाठी तयार केली, तसेच स्थानिक गुन्हे शाखेची दोन पथके समांतर तपास करीत होती. या पथकांनी सीसीटीव्ही फुटेज गोळा करणे, रेखाचित्र तयार करणे, गोपनीय माहिती गोळा करणे, रेकॉर्डवरील आरोपी तपासणे सायबर सेलच्या मदतीने तांत्रिक विश्लेषण करणे अशी जबाबदारी पार पाडली.

तपासादरम्यान पोलिसांना आगल्याची वाडी येथील महेश चायनाखवा याच्यावर संशय बळावला. त्याला ताब्यात घेऊन कसून चौकशी केली असता त्याने चोरी केल्याची कबुली दिली. पोलिसांनी त्याला अटक करून न्यायालयासमोर हजर केले. न्यायालयाने दिलेल्या पोलीस कोठडीच्या कालावधीत आरोपीने चोरलेला एक लाख ६० हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला.

### ग्रामस्थांचेही सहकार्य

तपासादरम्यान पोलिसांनी आगल्याची वाडी येथील नागरिकांची बैठक घेतली असता महेश चायनाखवा याच्या घरी दोनजण मागील काही महिन्यांपासून येत असून ते पैशांची मागणी करीत असल्याची माहिती मिळाली. त्या अनुषंगाने तपास केला असता, महेश याने या दोघांकडून कर्ज घेतले होते. त्यासाठी ते तगादा लावत होते, अशी माहिती पुढे आली. पोलिसांनी महेशला चौकशीसाठी ताब्यात घेतले. तेव्हा कर्ज परतफेडीसाठी चोरी केल्याची कबुली दिली.

## मोटरसायकलींची समोरासमोर धडक; एकजण जखमी



**पनवेल : वार्ताहर**

दोन दुचाकीस्वारांमध्ये समोरासमोर धडक बसल्याने झालेल्या अपघातात एक दुचाकीस्वार जखमी झाला आहे. त्याच्या उजव्या पायाचे पंजास व दोन्ही हातास दुखापत झाली आहे.

पनवेल माल धक्का येथे राहणारा राकेश पालकर (वय २५) हा त्याच्या ताब्यातील मोटारसायकल (एमएच ४६ सीजी ५८८२)ने पारगाव येथे चालवून घेऊन जात होता. वडघर गावा जवळील गतीरोधक जवळ आले असता समोरून येणारी मोटरसायकल (एमएच ४६ सीएफ ८०१४)वरील चालकाची राकेश याच्या मोटरसायकलला ठोकर बसली. या ठोकरमध्ये राकेशच्या उजव्या पायाचे पंजास व दोन्ही हातास दुखापत झाली.

या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. या घटनेचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक गोविंद दाभाडे करीत आहेत.

# मराठी माध्यमातून शिकूनही विद्यार्थ्यांची यशाला गवसणी -बापूसाहेब नेने

**पेण : प्रतिनिधी**

पेण एज्युकेशन सोसायटीमार्फत सोसायटीच्या प्रशालांमधून १० वी १२वीच्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते शिक्षणमहर्षी बापूसाहेब नेने उपस्थित होते.

आपले मनोगत व्यक्त करताना त्यांनी सांगितले की, आज इंग्रजी माध्यमातून मुल शिकायला हवी असा आग्रह पालकांकडून केला जात आहे, मात्र असे कित्येक विद्यार्थी आहेत की, जे मराठी माध्यमातून शिकूनही त्यांचे काही आडले नाही. इंग्रजी माध्यम जरी काळाची गरज असली तरी इंग्रजी माध्यमातूनच शिकायला हवे असा आग्रह नको. आज पेण एज्युकेशन सोसायटीच्या भाल, वरसई, वडखळ या ग्रामीण शाळांमध्ये इंग्रजी माध्यमातून शाळा कराव्यात असा आग्रह केला जात आहे, परंतु आपण सर्वांनी पालकांचे प्रबोधन करायला हवे जेणेकरून मराठी माध्यमांच्या शाळा वाचायला हव्यात, असे मत बापूसाहेब नेने यांनी मांडले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुधीर तथा बाळासाहेब जोशी यांनी केले, तर अध्यक्षीय भाषण पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मंगेश नेने यांनी केले. या सत्कार समारंभामध्ये पेण एज्युकेशन सोसायटीच्या गो. ना. म्हात्रे भाल, जय किसान वडखळ, म. ना. नेने पेण, प्रायव्हेट हायस्कूल पेण व वरसई येथील शाळांमध्ये दहावी व बारावीच्या गुणवंत ३४ विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा सत्कार करण्यात आला. या वेळी बापूसाहेब आठवले, शंकर देव, उपाध्यक्ष संजय कडू, मानद सचिव बाळासाहेब जोशी, कार्याध्यक्ष प्रशांत ओक, सदस्य समीर साने, डॉ. निता कदम, ज्योती राजे, सौ. शहा आदी उपस्थित होते.

दहावीमध्ये प्रथम ओम सदानंद पाटील (९६.६० टक्के), द्वितीय प्रज्वल गणेश धनावडे (८९.८० टक्के), तृतीय हार्दिक अशोक पाटील (८५ टक्के), चौथा व पाचवा अनुक्रमे वेदांत अनंत पाटील (८४.६० टक्के) व अजिंक्य वसंत नवाळे (८१.४० टक्के) या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांबरोबर इतर विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.



(छाया : इजाज मनियार)

# शिवराज्याभिषेक दिनी महाड आरोग्य विभागाचे कार्य कौतुकास्पद

**महाड : प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा ३५०वा शिवराज्याभिषेक दिन सोहळा किल्ले रायगडावर उत्साही वातावरणात आणि लाखो शिवभक्तांच्या उपस्थितीमध्ये झाला. या वेळी लाखोंच्या संख्येने आलेल्या शिवभक्तांना वैद्यकीय सेवा देणाऱ्या रायगड जिल्हा आरोग्य सेवेचे कार्य कौतुकास्पद असल्याचे मत असंख्य शिवभक्तांनी व्यक्त केले.

राज्य शासनातर्फे आयोजित करण्यात आलेल्या ३५०व्या शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त संपूर्ण देशातून लाखोच्या संख्येने शिवभक्तांनी उपस्थिती लावून छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन केले. या वेळी आलेल्या शिवभक्तांना चांगली आणि तत्पर आरोग्य सेवा मिळावी यासाठी रायगड जिल्हा आरोग्य विभागाने जयत तयारी केली आणि त्यामुळेच येणाऱ्या शिवभक्तांना अतिशय चांगल्या प्रकारे आरोग्यसेवा उपलब्ध झाली.

२ ते ६ जून या कालावधीमध्ये किल्ले रायगडावर ३५०वा शिवराज्याभिषेक सोहळा भव्य स्वरूपात साजरा करण्यात आला. या सोहळ्यात लाखो शिवभक्तांनी उपस्थिती लावली होती. येणाऱ्या शिवभक्तांना कोणत्याही स्वरूपाचा शारीरिक त्रास होऊ नये, यासाठी रायगड आरोग्य विभागाने विशेष खबरदारी घेतली होती.




महाड ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. भास्कर जगताप यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी दिलेल्या माहितीवरून जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुहास माने यांच्या मार्गदर्शनाखाली किल्ले रायगड आणि पाचाड या ठिकाणी जिल्हा रुग्णालय, महाड ग्रामीण रुग्णालय व रायगड स्कूल हेल्थ टीम यांच्या सहकार्याने अतिदक्षता विभाग सुरू करण्यात आला होता. यासाठी सुमारे १५ डॉक्टरांचे पथक तैनात करण्यात आले होते. १ जून ते ७ जून या कालावधीमध्ये सुमारे बाराशे रुग्णांची तपासणी करण्यात येऊन औषधोपचार करण्यात आले असल्याची माहिती डॉ. जगताप यांनी दिली.

शिवराज्याभिषेक उत्सव काळामध्ये एकाचा हृदयविकाराने, एक विजेचा शॉक लागून तर तिसरा दरड अंगावर कोसळल्याने मृत्यू झाला, परंतु दोन विंचूदंश झालेल्या रुग्णांवर योग्य उपचार करून त्यांना घरी पाठवण्यात आले, तसेच एकाला हृदयविकाराचा झटका आल्यानंतर त्याच्यावर तातडीने उपचार करण्यात आल्याने त्याचा जीव वाचवू शकलो, असे डॉ. जगताप यांनी माहिती देताना सांगितले.

आरोग्य विभागाचे अधिकारी कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेऊन शिवभक्तांची सेवा केली हे त्यांचे कार्य कौतुकास्पद आहे असे मत महाड पत्रकार संघाचे अध्यक्ष निलेश पवार आणि उपाध्यक्ष महेश शिंदे यांनी व्यक्त केले.

पान १ वरुन

## पंतप्रधान नरेंद्र मोदींमुळे भारत बलाढ्य बनतोय

ॲड. महेश मोहिते, भाजप दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष दिलीप भोईर, अलिबाग तालुकाध्यक्ष परशुराम म्हात्रे, मुरूड तालुकाध्यक्ष महेंद्र चौलकर, रोहा तालुकाध्यक्ष सोपान जांभेकर, हेमंत दांडेकर, सुनील दामले, अशोक वारगे, सतीश लेले, उदय काठे, समीर राणे, संतोष पाटील आदी या वेळी उपस्थित होते. मेळाव्या विविध योजनांच्या लाभार्थींना प्रातिनिधिक स्वरूपात लाभार्थी कार्डचे वाटप करण्यात आले.

संजय टंडन पुढे म्हणाले, नरेंद्र मोदी यांच्या पंतप्रधानपदाच्या कार्किर्दीला नऊ वर्ष पूर्ण झाली. या कालावधीत अनेक चांगल्या योजना राबविण्यात आल्या. कोव्हिडची लस सर्वांना मोफत देण्यात आली. भारतातील १८ हजार ४७६ गावांमध्ये वीजेचा खांब नव्हता. नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यानंतर त्यांनी या सर्व गावांमध्ये ९८० दिवसांत वीज पोहचवली. ज्या गावांमध्ये रस्ते नव्हते तेथे रस्ते केले, पाणी दिले. पूर्वी काम करण्यासाठी चिठ्ठी पद्धत बंद केली. यापुढेदेखील पंतप्रधान मोदींचेच नेतृत्व भारताला हवे आहे. मोदींचे हात बळकट करायचे आहे. त्यामुळे येत्या विधानसभा व लोकसभा निवडणुकीत समाजासाठी, देशासाठी काम करणाऱ्यांना मतदान करा, असे आवाहन त्यांनी केले.

मी पहिल्यांदाचा माहाराष्ट्रच्या सात दिवसांच्या दौऱ्यावर आलो. या सात दिवसांमध्ये महाराष्ट्र फिरलो. अनेक कार्यक्रमांना उपस्थित राहिलो. मी येथे बरेच काही शिकलो, देशभक्ती काय असते ती महाराष्ट्राने मला शिकवले, असे गौरवोद्गारही त्यांनी काढले. या वेळी ॲड. महेश माहिते यांनी प्रास्ताविक केले, तर परशुराम म्हात्रे यांनी आभारप्रदर्शन केले.

## मिरा रोडमध्ये श्रद्धा वालकर हत्याकांडाची पुनरावृत्ती

कुकरमध्ये ते शिजवून लपवण्यात आले होते. काही भाजलेले तुकडेही पोलिसांना आढळून आले आहेत. वुड कटरच्या वापराने त्याने लिव्ह इन पार्टनरच्या मृतदेहाचे तुकडे केले. त्यानंतर ते मिक्सरमध्ये बारीक केले. काही तुकडे कुकरमध्ये शिजवले. या सगळ्या तुकड्यांची तो विल्हेवाट लावत होता. पोलिसांनी ही माहिती दिली आहे.

अद्याप या महिलेच्या मृतदेहाचे काही भाग हे हरवलेले आहेत. पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. डीसीपी जयंत बजबळेंनी सांगितले की, मनोजच्या लिव्ह इन पार्टनरने म्हणजेच सरस्वतीने आत्महत्या केल्याचा दावा खोटा आहे. आम्हाला मनोजच्या घरात सरस्वतीच्या मृतदेहाचे असंख्य तुकडे सापडले. सरस्वती आणि मनोज हे १० वर्षांपासून एकत्र राहात होते. सरस्वती अनाथ होती तिला कुणीही नातेवाईक नाहीत. मनोज ४ जूनपासून सरस्वतीच्या मृतदेहाचे तुकडे कापत होता. या घटनेनंतरही आरोपी मनोज त्याच घरात राहात होता. किचनमध्ये तुकडे शिजवत होता आणि जेवायला बाहेर जात होता, अशी माहिती दिली आहे.

# वाशी मंडळात महावितरणचा वर्धापन दिन उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार**

महावितरण वर्धापन दिन मंगळवारी (दि. ६)वाशी मंडळातर्फे साजरा करण्यात आला. वाशी मंडळाने सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी खास मनोरंजनाचा कार्यक्रम गुजरात भवन, वाशी येथे आयोजित केले होते.



कोकण प्रादेशिक विभागाचे सहव्यवस्थापकीय संचालक चंद्रकांत डांगे, भांडुप परिमंडळाचे मुख्य अभियंता सुनील काकडे, सहाय्यक महाव्यवस्थापक (वि.व.ले.) प्रवीण रहांगदळे, सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं) हविषा जगताप, वाशी विभागाचे कार्यकारी अभियंता श्यामकांत बोरसे, पनवेल विभागाचे कार्यकारी अभियंता, सतीश सरोदे, चाचणी विभागाचे कार्यकारी अभियंता जगदीश बोडके, सर्व उपविभागाचे अभियंता व संघटनांचे पदाधिकारी या वेळी उपस्थित होते.

कोकण प्रादेशिक विभागाचे सहव्यवस्थापकीय संचालक चंद्रकांत डांगे यांनी महावितरण कंपनीच्या वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या. इतिहासकार, मोडीलिपी अभ्यासक व रायगड येथील राज्याभिषेक सोहळा समितीचे सदस्य पंकज भोसले यांनी श्री छत्रपती शिवाजी महाराजांवर रचलेले कविराज भूषण यांचे वीर सरसातील काव्य सादर केले व छत्रपतींची महती पोहचवली.

अधिकारी व कर्मचाऱ्यांनी गायन, नृत्य, मूकनाट्य आणि एकांकिका सादर केल्या. सारेगमप लिटिल चॅम्पमधून प्रकाशझोतात आलेली विजेती ज्ञानेश्वरी गाडगे हिच्या गाण्यांनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुतेज म्हात्रे, शर्वरी पाटील आणि सानिका राजगुडे यांनी केले.

# रिलायन्स इंडस्ट्रिज पाताळगंगातर्फे १३५० वृक्षांची लागवड

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा औद्योगिक वसाहतीतील रिलायन्स इंडस्ट्रीजकडून पाताळगंगा बोरीवली प्लॉट परिसरात ३५० आणि चौक मोर्बे धरण परिसरात १००० वृक्षांची लागवड करण्यात आली.

या वेळी विविध जातींच्या वृक्षांची लागवड चौक मोर्बे धरण आणि बोरीवली परिसरात करण्यात आली. या वेळी उपस्थित मान्यवरांनी पर्यावरण वाचविण्यासाठी रिलायन्स इंडस्ट्रीजकडून कश ाप्रकारचे प्रयत्न सुरू असल्याचे सांगून वृक्षलागवड करणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. शिवाय नागरिकांमध्ये पर्यावरणविषयी जनजागृती करणे महत्त्वाचे असून रिलायन्स इंडस्ट्रीज ते जोपासत आहे. वृक्षलागवड करून रोपांना पाणी सोडण्यात आले. वृक्षलागवडीनंतर वृक्षसंवर्धन करणे महत्त्वाचे असल्याचे मान्यवरांनी बोलताना सांगितले.



या वेळी पेट्रो अध्यक्ष आशु गर्ग, फायबर अध्यक्ष मल्लाप्पा बिराजदार, एचआर हेड थॉमस इसो, कॉर्पोरेट अफेअर्स संतोष विचारे यांच्यासह रिलायन्सचे पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या वेळी मोर्बे धरण परिसरात एक हजार वृक्षांची लागवड केल्याने नागरिकांनी पाताळगंगा रिलायन्स इंडस्ट्रीजचे आभार मानले.

## निवडक

### अपहार करणाऱ्या तिघांना अटक

**पनवेल :** तळोजा येथील दीपक फर्टिलायझर व पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन या कंपनीमध्ये नायट्रिक सिड घेऊन जाणाऱ्या तीन टँकरचालकांनी टँकर मधील नायट्रीक ॲसिड काढून घेत त्याचा परस्पर अपहार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. टँकर चालकांनी आपल्या टँकरमध्ये दुसरे द्रव्य भरून ते कंपनीत नेल्यानंतर केलेल्या तपासणीत हा प्रकार उघडकीस आला आहे. त्यानंतर तळोजा पोलिसांनी कंपनीच्या तक्रारीवरून तिन्ही टँकर चालकांविरोधात अपहाराचा गुन्हा दाखल केला आहे. राजकुमार कांबळे, चेन्नाबसप्पा गदलेकर व मधुकर कांबळे असे या प्रकरणात ताब्यात घेण्यात आलेल्या टँकरचालकांची नावे आहेत.

### कोनगाव येथून एक जण बेपत्ता

**पनवेल :** तालुक्यातील इंडियाबुल्स कोनगाव येथून एक



३० वर्षीय व्यक्ती कोणास काही एक न सांगता घरातून निघुन गेल्याने तो हरवल्याची तक्रार तालुका पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. रोशन लाला महतो असे या व्यक्तीचे नाव असून त्याचा रंग गोरा, उंची पाच फूट दोन इंच, अंगाने सडपातळ, अंगात काळा टी शर्ट व काळी जिन्स, डाव्या हातावर ब्लेडच्या जुन्या वाराच्या खुणा व टॅटू गोंदलेले असुन उजव्या हातावर पुजा कुमारी गोंदलेले असा वर्णन आहे. त्याला हिंदी, भोजपुरी भाषा बोलता येते. या व्यक्तीबाबत कोणास काही माहिती असल्यास तालुका पोलीस ठाणे (०२२-२७४५२४४४) किंवा पोलीस हवालदार अमर भालसिंग यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### गांजा विक्री करणाऱ्यास अटक

**पनवेल :** 'गांजा' हा अंमली पदार्थ बेकायदेशिररित्या विक्री करण्याच्या उद्देशाने स्वतःजवळ बाळगणाऱ्या व्यक्तीस पनवेल शहर पोलिसांनी पळस्पे फाटा परिसरातून अटक केली आहे. सोहेल इक्बाल शहा (वय २३) असे या आरोपीचे नाव आहे. पनवेल शहर पोलिसांचे पथक पळस्पे फाटा परिसरात गस्त घालत असताना त्यांना आरोपी सोहेल हा गांजा हा अंमली पदार्थाची बेकायदेशिररित्या विक्री करण्याच्या उद्देशाने स्वतःचे कब्जात बाळगल्याच्या स्थितीत आढळून आला. पोलिसांनी त्याच्याकडून ८,४७५ रुपये किमतीचा ०१ किलो १३० ग्रॅम वजनाचा गांजा जप्त केला. याप्रकरणी सोहेल यांच्याविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या घटनेचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक अभयसिंह शिंदे करीत आहेत.

### अनधिकृत खाद्यपदार्थांची विक्री

**पनवेल :** शहरामध्ये बेकायदेशीररित्या विनापरवाना फुटपाथवर टेबल टाकून चहा व तत्सम पदार्थ विक्री करणाऱ्याविरोधात पनवेल शहर पोलिसांनी कारवाई केली आहे. पनवेल बस स्टॅन्ड जवळील रोडच्या बाजुला असलेल्या फुटपाथवर चहा व तत्सम पदार्थ विक्रीसाठी टेबल लावुन त्यावर शेगडी ठेवुन ते सिलेंडरच्या सहायाने पेटवुन ज्वालाग्राही साहित्याचा हयगईने वापर केल्याबद्दल मोहम्मद जुबेर अब्दुल रहेमान (वय ३२, रा. पनवेल) यांच्यावर पनवेल शहर पोलिसांनी कारवाई केली आहे.

# अनधिकृत शाळांमुळे प्रवेश घेतलेल्या हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात

**पनवेल : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी यांनी पनवेल तालुक्यातील दहा शाळा अनधिकृत जाहीर केल्याने तेथील प्रवेश घेतलेल्या हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात आले आहे. त्यांना दुसऱ्या शाळेत प्रवेश देण्याची व फी परत मिळवून देण्याची जबाबदारी कोणाची? आपल्या पाल्याच्या भविष्याच्या चिंतेमुळे शिक्षण खात्याला एवढ्या उशिरा का जाग आली. या शाळा जाहिरात करून प्रवेश देत असताना शिक्षण खाते काय करीत होते, असे अनेक प्रश्न पालक विचारीत आहेत.

रायगड जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी (प्राथमिक) विभागाकडून जिल्ह्यातील अनधिकृत असलेल्या प्राथमिक शाळांची यादी जाहीर केली त्यामध्ये पनवेल तालुक्यातील दहा शाळांचा समावेश आहे. या शाळा शासनाच्या परवानगी विना सुरू असल्याने पालकांनी या शाळांमध्ये आपल्या पाल्यास दाखल करू नये, असे आवाहन शिक्षणाधिकारी पुनीता गुरव यांनी केले आहे. तरीही या शाळांमध्ये मंगळवारी प्रवेश सुरू असल्याचे दिसून आले आहे. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी मंगळवारी (दि. ६ जून) अनधिकृत शाळांची यादी जाहीर केली, पण या शाळांनी त्यापूर्वीच जाहिरात करून आपली प्रवेश प्रक्रिया सुरू केली होती. आजच्या काळात शाळेत प्रवेश मिळणे अवघड असल्याने पालकांनी ही हजारो रुपये फी भरून प्रवेश घेतले. त्या पालकांपुढे आता प्रश्न निर्माण झाला आहे काय करायचे. शिक्षण अधिकारी म्हणतात प्रवेश रद्द करा. तुम्ही त्यांच्याकडे फी परत मागा, पण शाळा फी परत देणार नाही. पुन्हा दुसरीकडे प्रवेश मिळणे अवघड आहे. त्यासाठी पुन्हा पैसे कोठून आणायचे. शाळेचे कर्मचारी सांगतात शासनातर्फे, अशी दरवर्षी अशी यादी जाहीर केली जाते. आम्हाला परवानगी नसली तरी काळजी करू नका आम्ही मुलांना अधिकृत शाळेतून परीक्षेला बसवणार आहोत. यामूळे पालकांची अवस्था मात्र द्विधा झाली आहे. त्यांना काही विचारल्यास ते बोलायला तयार नाहीत.

पनवेलचे गट शिक्षण अधिकारी सीताराम मोहिते यांना अनधिकृत शाळा प्रवेश सुरू असल्याबद्दल विचारले असता आम्ही त्यांना १५ दिवसांची नोटीस देत आहोत. त्यांनी शाळा बंद करावी. कोणाला प्रवेश देऊ नये; अन्यथा १० लाख रुपये दंड किवा फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल. पालकांनीही आपल्या मुलांचा प्रवेश रद्द करून त्यांचाकडून फी परत घ्यावी; अन्यथा शाळेवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करावा, असे सांगितले

शाळा सुरू करण्यासाठी संस्थेने प्रथम शासनाकडे विहित नमुन्यात अर्ज करायचा असतो. त्यांनी अटी पूर्ण केल्या असल्यास त्यांना इरादा पत्र दिले जाते. ते दिल्यावर १८ महिन्यांत त्यांनी सर्व भौतिक सुविधा पूर्ण केल्यावर त्यांना शाळा सुरू करायला परवानगी दिली जाते.

> **पालकांनी प्रवेश घेताना शाळेबाबत चौकशी करणे गरजेचे होते. त्यांच्या पाल्यांना महापालिकेच्या व इतर शाळेत प्रवेश दिला जाईल. आम्ही गट शिक्षण अधिकाऱ्यांना विना परवाना सुरू असलेल्या शाळांची यादी पाठवण्यास सांगितले होते. लगेच दुसऱ्या दिवशी अनधिकृत शाळांची यादी जाहीर केली. उशिरा पाठवली असल्यास त्यांच्यावर कारवाई होईल. पनवेलच्या गट शिक्षण अधिकाऱ्यांना ज्या शाळा अनधिकृत आहेत त्या शाळा सुरू होऊ नयेत, यासाठी केंद्र प्रमुख किवा विस्तार अधिकारी नेमून खबरदारी घेण्याच्या सूचना दिल्यात.**
>
> **-पुनीता गुरव,** शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि. प. रायगड

> **पनवेल शहरात असणाऱ्या मोठ्या शाळांची फी करंजाडेमध्ये राहणार्या मध्यमवर्गीय आणि गरीब लोकांना परवडणारी नाही. त्यामुळे आम्ही त्यांच्या सोयीसाठी शाळा सुरू केली आहे. शासनाचे रजिस्ट्रेशनचे नियम कडक असल्याने आम्हाला परवानगी मिळत नाही. आमची शाळा ही प्री-प्रायमरी आहे. पण काही पालक त्यानंतर विनंती करतात म्हणून आम्ही दुसऱ्या शाळेबरोबर टायप करून त्यांना पहिली व दुसरीसाठी प्रवेश देतो. शासनाने यातून मार्ग काढला पाहिजे.**
>
> **-हरिषमल,** संस्था चालक, वेद गृह पब्लिक स्कूल

### पनवेलमधील बेकायदा शाळा

*मार्शमेलोज इंटरनॅशनल स्कूल ओवे, तुळजाभवानी शिक्षण मंडळ संचलित सरस्वती विद्यामंदिर, केळसेकर इंग्लिश मीडियम स्कूल तळोजा पाचनंद, अर्कम इंग्लिश स्कूल तळोजा, वेदिक ट्री प्री स्कूल करंजाडे, वेद ड्राप पब्लिक स्कूल करंजाडे, विनायक आश्रय, करंजाडे, डॉल्फिन किड्स स्कूल, करंजाडे, ओसीन ब्राईट कॉन्हेंट स्कूल तळोजा, वेदांत पब्लिक स्कूल कळंबोली, ऑक्सफोर्ड इंग्लिश स्कूल कळंबोली, सेंट अन्योनी इंग्लिश स्कूल करंजाडे, एस.जी. टी. इंटरनॅशनल स्कूल करंजाडे, वेद गृह इंटरनॅशनल स्कूल करंजाडे, ओझन्स इंटरनॅशनल स्कूल कोळखे, प्लीजन्ट इंग्लिश स्कूल सांगडे, एस. बी. पी. इंग्लिश स्कूल शेडुंग, पायोनियर पब्लिक स्कूल पारगाव, लिटल चॅम्प ओवळे, एकलव्य स्कूल ओवळे, साई गणेश एज्युकेशन सोसायटीची लाटे विनायक केशव जोशी मेमोरियल नवजीवन इंटरनॅशनल स्कूल टोल नाका आपटा फाटा, दी इंग्लिश स्कूल, उलवा, न्यू इंग्लिश स्कूल, कोपरा, रोहिंजण इंग्लिश स्कूल रोहिंजण, आकृती एज्युकेशनल अँड वेलफेअर सो. एस. एम. बी. इंटरनॅशनल स्कूल उलवे.*

## अल्पवयीन मुलाचे अपहरण

**पनवेल :** शहरातून एका १७ वर्षीय अल्पवयीन तरुणाला कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी कायदेशीर रखवालीतुन फूस लावून पळवून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



अपहरण झालेल्या तरुणाची उंची १६० सेमी असून त्याचा रंग सावळा, अंगाने सडपातळ, चेहरा गोल, दाढी बारीक डोक्याची केस बारीक कट केलेला, अंगात सफेद रंगाचा फुल बाह्यांचा शर्ट त्यावर छातीजवळ काळा पटटा, काळी जिन्स, पायात काळी प्लास्टीकची स्लीपर असा त्याचा वर्णन आहे. तसेच त्याच्या उजव्या हाताचे मनगटाचे वर साईबाबाचा फोटो गोंदलेला आहे. या तरुणाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा सहाय्यक पोलीस निरीक्षक राजरत्न खैरणार यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## कायदा सुव्यवस्थेच्या प्रश्नावर शांतता कमिटीची बैठक

**पनवेल : वार्ताहर**

सध्या महाराष्ट्रात सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट व स्टेटस वायरल होत असल्याने हिंदुत्ववादी संघटना आक्रमक झाल्या आहेत. त्यामुळे कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून गुरुवारी (दि. ८) पनवेल शहर पोलीस ठाणे येथे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांच्या अध्यक्षतेखाली शांतता कमिटीची बैठक आयोजित करण्यात आली होती. या वेळी विजय कादबाने यांनी उपस्थितांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या.



विजय कादबाने यांनी काही अनुचित प्रकार निदर्शनास आल्यास तत्काळ पोलीस ठाणे येथे माहिती द्यावी या बाबत सूचना केल्या. या वेळी शांतता कमिटीचे सदस्य जयंत पगडे, महेश साळुंखे, मुकीद काझी, पराग बालड, जवाद काझी, इम्तियाझ बेग, नावेद पटेल, मोझेस कोरलेकर, इमाउद्दीन देशमुख, प्रसाद म्हात्रे यांच्यासह गोपनीय विभागाचे अधिकारी संजय धारेराव उपस्थित होते.



**पनवेल : श्री गणेश मित्र मंडळ, न्हावेखाडी-मधलापाडा या मंदिरात रिक्षा चालक-मालक संघटना रामबाग न्हावा-न्हावाखाडी यांच्या वतीने संकष्ट चतुर्थीचे औचित्य साधून अन्नदान करण्यात आले. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी उपक्रमाला भेट देत मंदिरात दर्शन घेतले. या वेळी अरुणशेठ ठाकूर, सागरशेठ ठाकूर, राम मोकल, रतन ठाकूर, सी. एल. ठाकूर, नरेश मोकल, श्रीधर मोकल, सुभाष कडू, नारायण घरत, भगवान मोकल तसेच रिक्षा चालक-मालक संघटनेचे पदाधिकारी, ग्रामस्थ उपस्थित होते. आयोजकांकडून मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.**



**पनवेल : महापालिकेचे माजी नगरसेवक विकास घरत यांच्या वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी नगरसेवक विजय चिपळेकर, भाजपचे ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, मनोहर भिडे, चंद्रकांत कडू, जगन्नाथ कडू, संतोष म्हात्रे, वैभव भोपी, मंगेश भेंडे, मयूर भेंडे, विकास भेंडे,, अंकुश जोरी, नितेश म्हात्रे, निलेश घरत, अण्णा शेठ, सचिन शिरढोणकर, हरेश भोपी, नारायण कडू आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.** (छाया : विकास म्हात्रे)

## अक्षय भालेरावच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा देण्याची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

नांदेड येथील बोंडार हवेली येथील मागासवर्गीय समाजाचा युवक अक्षय भालेराव याच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे रायगड जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांनी शहर पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक उद्धव सोळंके यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

नांदेड जिल्ह्यातील बोंडार हवेली येथीला युवक अक्षय भालेराव याचा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आबेडकर यांची जयंती साजरी केली, म्हणून सवर्ण समाजातील गावगुंडांनी अक्षयचा निर्घुणपणे खून केला. यामुळे दलित समाजामध्ये भितीचे व दहशतीचे वातावरण पसरलेले आहे. दलितांवर अन्याय करण्याचे प्रमाण वाढत चाललेले आहे. अश्या नराधम कृत्य करणाऱ्या आरोपींना फाशीची सजा देण्यात यावी व त्यासाठी उज्वल निकम सारखा सरकारी वकील नेमण्यात यावा, अशी मागणी साळुंखे यांनी केली आहे.

या वेळी दिलीप नाईक, समाधान कांबळे, मनोज कांबळे, भारत दातार, आसिफ शेख, मुमताज पठाण, सुमन पाटील, रखमाबाई आदी उपस्थित होते.



## श्री स्वामी समर्थ समाज मंदिर पाचवा वर्धापन दिन



**उरण : वार्ताहर**

उरण शहरातील आनंद नगर येथील श्री स्वामी समर्थ समाज मंदिर व बालसंस्कार केंद्राचा ५ वा वर्धापन दिन सोहळा मंगळवारी (दि. ६) मोठ्या उत्साहात आनंदात साजरा करण्यात आला. त्या निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सुमारे १९०० भक्तांनी दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला, अशी माहिती कार्यकारी मंडळांनी दिली.

सकाळीपासून सायंकाळपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यानंतर श्री स्वामी समर्थ पालखी सोहळा झाला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंदिर व सेवासंघ सेवेकरी, कार्यकारी मंडळ सदस्य आदींचे यांचे सहकार्य लाभले.

## कळंबोलीत नेत्र तपासणी शिबिर

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

कळंबोली येथे मा कोकण म्हाडा सभापती मा श्री बाळासाहेब पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त योगीराज फाउंडेशनच्या माध्यमातून नेत्र तपासणी व अल्प दरात चष्मे वाटप शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन भाजपाचे माजी नगरसेवक राजेंद्र शर्मा याच्या हस्ते करण्यात आले. या नेत्र तपासणी शिबिराला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. नगरसेवक राजेंद्र शर्मा यांच्या प्रयत्नाने या शिबिराचे आयोजन केले होते. याचा कळंबोली व परिसरातील २६२ नागरिकांनी लाभ घेतला. या वेळी कमल कोठारी, ज्येष्ठ नेते देविदास खेडेकर, प्रकाशजी शेलार, आबा घुटूकडे संदीप भगत व सामाजिक कार्यकर्ते प्रशांत गायकवाड, आशा सेविका सुवर्णा चव्हाण आदी उपस्थित होते.

विशाल बोबडे त्यांच्या योगीराज फाउंडेशनच्या माध्यमातून या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याचे बोबडे यांच्या सहकाऱ्यांनी चांगले आयोजन केले होते.





**पनवेल : उरण तालुका दैनिक पत्रकार संघाची २०२३ ते २०२४ या कालावधीकरीता घेण्यात आलेली कार्यकारिणीची निवड ही बिनविरोध झाली. यात जीवन केणी यांची अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. त्यानिमित्त त्यांनी पत्रकार संघाच्या सहकाऱ्यांसह माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची गुरुवारी सदिच्छा भेट घेतली. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केणी यांना शुभेच्छा दिल्या. या वेळी उरण तालुका दैनिक पत्रकार संघाचे सदस्य मधुकर ठाकूर, सूर्यकांत म्हात्रे, अनंत नारांगिकर, जगदीश तांडेल, महेश भोईर उपस्थित होते.** (छाया : अक्षय शार्दुल)


## संपादकीय

# हिंसाचारामागे कोण?

समाजमाध्यमे कशाप्रकारे माथी भडकवू शकतात याचे प्रत्यंतर गेले दोन-तीन महिने महाराष्ट्रात पुन्हा पुन्हा येत आहे. जाणून-बुजून राज्यातील कायदा व सुव्यवस्था परिस्थिती बिघडवण्याचे प्रयत्न सुरू आहेत, का असा प्रश्न उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कोल्हापुरातील ताज्या हिंसाचारानंतर उपस्थित केला आहे, तो रास्तच म्हणावा लागेल.

**कोल्हापुरात मंगळवारी शिवराज्याभिषेक सोहळा साजरा होत असतानाच काही तरुणांनी औरंगजेबाचे स्टेटस आपल्या मोबाइलवर ठेवल्यामुळे स्वाभाविकपणे तिथे संतप्त प्रतिक्रिया उमटली आणि अखेर बुधवारी तिथे दंगलीचा भडका उडाला. या अशा माथी भडकवणाऱ्या स्टेटसविरोधात हिंदुत्ववादी संघटनांनी बुधवारी 'कोल्हापूर बंद'ची हाक दिली होती. त्याला प्रतिसाद देत हजारो कार्यकर्ते व नागरिक शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात जमले होते. पोलिसांनी मोर्चाला परवानगी नाकारल्यानंतर जमावाने जोरदार घोषणाबाजी करत दगडफेक, तोडफोड सुरू केली. दोन्ही बाजूचे लोक समोरासमोर आल्याने अखेर पोलिसांना अश्रुधुराच्या नळकांड्या फोडत लाठीमार करावा लागला. त्यानंतर दिवसभर कोल्हापुरात अतिशय तणावपूर्ण परिस्थिती होती. सायंकाळनंतर परिस्थिती नियंत्रणात आली तरी पूर्ण जिल्हा बंद असल्याचे दिसून आले. बुधवारच्या घडामोडींनंतर कोल्हापूर जिल्ह्यात १९ जूनपर्यंत जमावबंदीचा आदेश जारी करण्यात आला असून शहरातील दंगलप्रकरणी सहा जणांना अटक करण्यात आली आहे. कोल्हापुरातील हिंसाचारानंतर नागपुरात प्रसारमाध्यमांशी बोलताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, औरंगजेबाच्या एवढ्या अवलादी अचानक कशा जन्मल्या याचा शोध घ्यावा लागेल. जाणूनबुजून कायदा व सुव्यवस्था बिघडवण्याचे काहींचे प्रयत्न सुरू आहेत. हे कोण करीत आहे हे तपासून बघावे लागेल, असे प्रतिपादन केले. राज्यात गेल्या काही महिन्यांपासून निरनिराळ्या शहरांमध्ये असे जातीय तणाव निर्माण होताना दिसले आहेत. समाजमाध्यमांचा वापर करून सर्वसामान्यांची माथी भडकावण्याचा डाव खेळला जात आहे. छत्रपती संभाजीनगरापाठोपाठ मुंबईतील मालवणी, जळगाव, अकोला, नगर-शेवगाव, त्र्यंबकेश्वर, संगमनेर येथेही असा प्रयत्न झाला. गुरूवारी कोल्हापुरच्या पोलीस अधीक्षकांनी दिलेल्या माहितीनुसार, स्टेटस ठेवणाऱ्या ज्या सहा तरुणांना अटक करण्यात आली आहे ते सारे कॉलेजला जाणारे तरुण आहेत. सर्व जण अल्पवयीन आहेत. एकमेकांची स्टेटस त्यांनी कॉपी केली असे आढळून आले असून त्यांना कुणी फूस लावली होती का याचा शोध पोलीस घेत आहेत. औरंगजेबाचे उदात्तीकरण करणाऱ्यांना महाराष्ट्रात माफी नाहीच या भूमिकेचा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुनरुच्चार केला आहे तर विरोधीपक्षाच्या नेत्यांकडून मात्र याप्रकरणी उलट सरकारवरच टीका करण्यात आली. राज्यात गेल्या काही दिवसांपासून ठिकठिकाणी उसळत असलेल्या हिंसाचाराची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही गंभीर दखल घेतली आहे. कायदा हातात घेणाऱ्या कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही, असे स्पष्ट करत त्यांनी दोषींवर कठोर कारवाईचे आदेश दिले आहेत. कोल्हापुरात विरोधीपक्षाच्या एका नेत्याने दंगल घडविण्यात येणार आहे असे म्हणताच पाठोपाठ औरंगजेब आणि टिपू सुलतान यांच्या उदात्तीकरणाच्या घटना कशा घडल्या? या घटना आणि संबंधित विधान यांचा काही संबंध आहे का? अचानक कोण पुढे आले आणि त्यांना कोणाची फूस आहे याची चौकशी करण्यात येईल, असे फडणवीस यांनी म्हटले असून राज्यात नेमके आताच अनेक जिल्ह्यांमध्ये औरंगजेबाचे उदात्तीकरण का होताना दिसते आहे याच्या मुळाशी जाण्याची निश्चितच गरज आहे.**

# तळीये दरडग्रस्तांना गृहप्रवेशाची प्रतीक्षा



महाड तालुक्यातील तळीये गावात २१ जुलै २०२१ रोजी दरड कोसळली होती. या दुर्घटनेत गावातील ८७ जणांचा बळी गेला. दरडग्रस्त तळीये गावच्या पुनर्वसन काम म्हाडामार्फत सुरू करण्यात आले आहे. या दुर्घटनेला जवळजवळ दोन वर्षे पूर्ण होत आली आहेत, परंतु या दरडग्रस्तांचे पुनर्वसन अद्याप झालेले नाही. आता पावसाळा सुरू होईल. अजूनही त्यांचे पुनर्वसन झालेले नाही. तळीये दरडग्रस्त नवीन घरांच्या गृहप्रवेशाच्या प्रीक्षेत आहेत.

२१ जूलै २०२१ रोजी तळीये गावात दरड कोसळली. २१ आणि २२ जुलैला रायगड जिल्ह्यात अतिवृष्टी झाली. या अतिवृष्टीमुळे महाड तालुक्यातील तळीये गावावर भली मोठी दरड कोसळली. यात ३२ घरे दरडी खाली गाढली गेली. या दुर्घटनेत ८४ जणांचा मृत्यू झाला. त्यानंतर शासनाने या गावातील लोकांचे पूनर्वसन करण्याचा निर्णय घेतला.

तात्पूर्ते पुनर्वसन करण्यासाठी कंटेनर हाऊसचा पर्याय निवडण्यात आला आहे. काही कंपन्यांच्या सामाजिक दायित्व निधीतून हे कंटेनर हाऊस मागविण्यात आले, परंतु तात्पर्ते पनर्वसन होते. गावाच्या पुनर्वसनाची जबाबदारी शासनाने घेतली. म्हाडाच्या माध्यमातून संपुर्ण गावाचे पुनर्वसन करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. नवीन घर बांधून देण्यात येणार होती. त्या कामाला सुरूवात देखील झाली. यंदाच्या पावसाळपूर्वी नवीन घरात जाता येईल असे तळीये गावातील लोकांना वाटत होते, परंतु अद्याप तरी लोकांना घर मिळालेली नाहीत. पावसाळ्यापुर्वी तयार असलेल्या ६६ घरांचा ताबा दरडग्रस्तांना दिला जाईल, अशी ग्वाही जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी दिली आहे. किमान जी घर बांधून तयार आहेत. त्यांना तरी नवीन घरांचा ताबा पावसाळ्यापूर्वी द्यायला हवा.

**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

दरडग्रस्तांसाठी वैशिष्ट्यपूर्ण घरांची निर्मिती करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. ज्या ठिकाणी गाव अस्तित्वात आहे तेथे पुनर्वसन करणे शक्य नव्हते कारण तिथं पुन्हा दरडी कोसळण्याचा धोका होता. हे लक्षात घेवून गावापासून जवळच जागा संपादित करण्यात आली. या जागेवर घरे उभारण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. प्रत्यक्ष दरडी खाली नष्ट झालेली ६६ आणि उर्वरित कुटुंबे मिळून २७१ कुटुंबांसाठी ही घरे उभारली जात आहेत. प्रत्येक कुटुंबाला ६२३ चौरस फुटांची घरे दिली जाणार आहेत. नैसर्गिक आपत्तीचा सामना करणारी, भूकंप अवरोधक असतील शिवाय तापमानाचे संतुलन राखणारी असतील. याकरिता घरांच्या छपरासाठी पफ पॅनलचा वापर करण्यात येत आहे. म्हाडाने ही घरे उभारण्याचे काम ट्रान्सकॉन डेव्हलपर प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला दिले आहे. सध्या ६६ घरांचे काम पूर्ण झाले असून ३८ घरांची कामे अंतिम टप्प्यात आली आहेत. उर्वरीत कामेही दिवाळीपर्यंत पूर्ण होण्याची शक्यता आहे.

घरांची जबाबदारी म्हाडाने घेतली तर तिथे मूलभूत सुविधा पुरवण्याची जबाबदारी राज्य शासनाने घेतली असून त्यांची अंमलबजावणी रायगड जिल्हा परिषदेच्या माध्यमातून केली जात आहे. गावासाठी पाणी पुरवठा, रस्ते, गटारे, सांडपाणी व्यवस्थापन, शाळा, अंगणवाडी, समाजमंदिर अशा सुविधा दिल्या जाणार असून त्याचे काम सुरू करण्यात आले आहे, मात्र काही गटारांची कामे निकृष्ट दर्जाची आणि चुकीच्या पध्दतीने झाल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले होते. त्यामुळे ही कामे पुन्हा करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले होते. त्यामुळे गटारे आणि सांडपाणी व्यवस्थापनाची कामे घरांचे जोड रस्त्यांची कामे पुन्हा सुरू करण्यात आली होती. ही कामे पुर्ण होताच ६६ घरांचा ताबा दरडग्रस्तांना दिला जाणार आहेत. ही कामे लवकरात लवकर पूर्ण करून किमान या ६६ घरांमध्ये तरी गृहप्रवेश करण्यासाठी प्रयत्न करायाला हवेत. उर्वरीत लोकांनादेखील लवकरात लवकर घरांचा ताबा मिळाला पाहिजे.

२००५ मध्येझालेल्या अतिवृष्टीमध्ये रायगड जिल्ह्यात महाड व पोलादपूर तालुक्यांमध्ये दरगडीकोसळून अनेक घर दरडीखाली गाढली गेली. यात २१२पेक्षा जास्त लोकांचा मृत्यू झाला. त्यांनतर या परिसाराचे भूवैज्ञानिक सर्वेक्षण करण्यात आले. भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभागाने सर्वेर्क्षण करून रायगड जिल्ह्यातील दरडप्रवण गावांची माहिती दिली. त्यानंतरही संख्या वाढत गेली. रायगड जिल्ह्यात दरवर्षी दरडग्रस्त गावांची संख्या वाढत चाली आहे. भविष्यात तळीये सारख्या दुर्घटना घडूनयेत म्हणून शासनाने निर्णय घ्यायला हवेत.

जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यातील सर्व डोंगर उतारावर असलेल्या गावांचा पुन्हा एकदा भूवैज्ञानिक सर्वेक्षण करणे गरजेचे आहे. ज्या गावांना दरडीचा धोका सर्वाधिक आहे. त्या गावांमधील लोकांचे सुरक्षीतस्थळी पुनर्वसन करण्याबाबत शासनाने विचार केला पाहिजे. शक्यतो त्याच गावात पुनर्वसन होईल, असे पाहिले पाहिजे. तसे झाल्यास लोक पुनर्वसनास तयार होतील. जर शासन दरडग्रस्त गावातील लोकांचे त्याच गावात सुरक्षित स्थळी पुनर्वसन करत असेल तर ग्रामस्थांनीदेखील आडमुठेपणा नघेता शासनाला सहकार्य केले पाहिजे.









## बदलते तंत्रज्ञान

# आता आधार नंबरद्वारे युपीआय करू शकता ॲक्टिव्हेट!




डिजिटल व्यवहारांमध्ये क्रांती घडवणाऱ्या यूपीआयला ग्राहकांसाठी दररोज अधिक सुलभ करण्यात येत आहे. जेणेकरून अधिकाधिक लोकांना यूपीआयचा वापर करता येईल. यूपीआयद्वारे पेमेंट सेवा प्रदान करणार्या गुगल पे या ॲपने आपल्या ग्राहकांसाठी एक नवीन सुविधा सुरू केली आहे. कंपनीने म्हटले आहे की, आता युजर्स आधार क्रमांक वापरून ॲपवर UPI सेवा सक्रिय करू शकतात.

ही सुविधा सुरू केल्यानंतर, आता Google Pay युजर्स आपल्या डेबिट कार्डशिवाय त्यांचा UPI पिन सेट करू शकतात. परंतु युजर्स या सुविधेचा वापर तेव्हाच करू शकतात, जेव्हा त्यांचा मोबाईल क्रमांक, बँक खाते आणि आधार नंबर एकमेकांशी लिंक असेल. Google Pay ने एक निवेदन जारी केले आहे की, हे फीचर णझख वापरत असलेल्या करोडो भारतीयांना आणि इतर अनेक युजर्सना णझख सेट करण्यासाठी मदत करेल.

**आता मिळतील दोन ऑप्शन**

गुगल पे ॲपवर हे फीचर आणल्यानंतर आता युजर्सना अकाउंट सक्रिय करण्यासाठी दोन पर्याय दिले जातील. पहिल्या ऑप्शनमध्ये युजर्स आपले अकाउंट केवळ डेबिट कार्डद्वारे सक्रिय करू शकतात किंवा दुसऱ्या ऑप्शनमध्ये युजर्सचे अकाउंट त्यांच्या आधार नंबरसोबत सक्रिय करू शकतात. युजर्स या दोन ऑप्शनपैकी एक निवडू शकतात.

**UPI द्वारे झाले ९४१ कोटी व्यवहार**

गेल्या आठवड्यातच नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने (NPCI) ताजी आकडेवारी जाहीर करताना सांगितले होते की, मे महिन्यात एकूण ९४१ कोटी व्यवहार णझख द्वारे झाले आहेत. तसेच, जर आपण या व्यवहारांचे मूल्य पाहिले तर केवळ मे महिन्यात UPI द्वारे १४.३ लाख कोटी रुपयांचे व्यवहार झाले आहेत, जे एका वर्षापूर्वीच्या तुलनेत ३७ टक्के अधिक आहे, असे NPCI ने सांगितले.

# भारतातील पहिल्या महिला आयपीएस किरण बेदी



**निमित्त**

किरण बेदी या भारतातील पहिल्या आयपीएस (अखिल भारतीय इंडियन पोलीस सर्व्हिससाठीच्या परीक्षेतून आलेल्या) अधिकारी आहेत. मसूरी येथील राष्ट्रीय अकादमीमध्ये पोलीस ट्रेनिंगमध्ये ८० पुरुष तुकडीतील त्या एकमेव महिला होत्या. त्यांचा आज जन्मदिन आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्याविषयी या लेखातून...

किरण बेदी यांची पोलीस अधिकारी म्हणून पहिली नेमणूक दिल्लीच्या चाणक्यपुरीत झाली. पुढे त्या उत्तर आणि पश्चिम दिल्लीच्या पोलीस आयुक्त झाल्या. १९९३ मध्ये दिल्लीतील तिहार कारागृहाच्या त्या मुख्य अधीक्षक (इन्स्पेक्टर जनरल ऑफ प्रिझन्स) झाल्या. तेथे असताना त्यांनी कारागृहामध्ये अनेक सुधारणा केल्या. त्याची जागतिक स्तरावर प्रशंसा झाली आणि या सुधारणेसाठी १९९४ मध्ये त्यांना रेमन मॅगसेसे पुरस्कार मिळाला.त्यांनी महिलांवरील गुन्हे कमी करून दाखवले. त्यानंतर एक ट्रॅफिक पोलीस अधिकारी म्हणून त्यांनी १९८२ आशियाई गेम्ससाठी दिल्लीत आणि १९८३ मध्ये गोव्यात भरलेल्या सीएचओजीएम बैठकीसाठी रहदारी व्यवस्था पाहिली.

किरण बेदी यांनी उत्तर दिल्लीच्या डीसीपी असताना ड्रग्जचा दुरूपयोग करण्याऱ्यांविरुद्धच्या मोहिमेची सुरुवात केली. ही मोहीम पुढे नवज्योती दिल्ली पोलीस फाऊंडेशन (२००७मध्ये हिचे नाव नवज्योती इंडिया फाऊंडेशन म्हणून बदलले)मध्ये विकसित झाली. २००३मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाचे महासचिव म्हणून पोलीस सल्लागार म्हणून बेदींनी काम केले. शांतता ऑपरेशनचा या सामाजिक कार्यक्रम आणि लेखन यांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी त्यांनी २००७मध्ये पोलीस खात्याचा राजीनामा दिला. किरण बेदी यांनी अनेक पुस्तके लिहिली आहेत. त्या इंडिया व्हिजन फाऊंडेशन नावाची संस्थेच्या संचालक आहेत. २००८-२००९ दरम्यान त्यांनी दूरचित्रवाणीवर 'आप की कचेरी' हा एक कोर्ट शो आयोजित केला.

२०११ च्या भारतीय भ्रष्टाचारविरोधी चळवळीच्या प्रमुख नेत्यांपैकी त्या एक होत्या आणि जानेवारी २०१५ मध्ये त्या भारतीय जनता पक्षात सामील झाल्या. २०१५ च्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत त्यांनी पक्षाच्या मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार म्हणून असफल निवडणूक लढवली. २२मे २०१६ रोजी बेदी यांना पाँडिचेरीच्या लेफ्टनंट गव्हर्नर म्हणून नेमण्यात आले. निवृत्तीनंतर (अण्णा हजारे) यांच्या लोकपालासाठीच्या आंदोलनात त्या सहभागी झाल्या होत्या.

किरण बेदी यांचा जन्म ९ जून १९४९ साली झाला. त्यांच्या वडिलांचे नाव प्रकाशलाल असे होते. किरण बेदीचे शिक्षण अमृतसरमधील सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंट स्कूलमधून झाले. ही शाळा घरापासून १५ किलोमीटर दूर असल्यामुळे त्यांना कष्ट करावे लागत होते. शिक्षणाबरोबरच किरण बेदी या खेळातही चपळ होत्या. शाळेत असताना त्या एन.सी.सी.त होत्या. किरण बेदी या शाळेच्या ग्रंथालयाचा खूप उपयोग करायच्या. त्यानंतर त्यांनी 'गव्हर्नमेंट कॉलेज फॉर वीमेन' यामध्ये प्रवेश घेतला.

पोलीस सेवेतील कारकीर्द सुरू करण्यापूर्वी किरण बेदी या अमृतसर येथील खालसा महाविद्यालयात राज्यशास्त्र विषयाच्या प्राध्यापक होत्या. किरण बेदी पोलीस अधिकारी होण्याआधी या उत्कृष्ट टेनिसपटू होत्या. ऑल इंडिया हार्ड कोर्ट टेनिस चॅम्पियन, १९७४ च्या चंदीगडमधील राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील महिला चॅम्पियन, श्रीलंका विरुद्ध दोन वेळा भारताचे प्रतिनिधित्व अशी त्यांची टेनिसमधील उल्लेखनीय कामगिरी आहे.

टेनिस कोर्टवर किरण बेदी यांची ब्रिज बेदी यांच्याशी भेट झाली. त्यांचा विवाह १९७२ साली झाला. त्याच वर्षी त्या आय.पी.एस.ची परीक्षा उत्तीर्ण झाल्या. ब्रिज बेदी किरण बेदी यांना सरकारी नोकरीसाठी प्रोत्साहित करीत राहिले. किरण बेदी यांच्या मुलीचे नाव सायना बेदी असे आहे.

**(साभार : विकीपिडीया)**

## आरोग्य प्रहर



# साखर नियंत्रणासाठी 'या' भाज्या ठरतात वरदान

मधुमेह असलेल्या लोकांनी आहारात जीवनसत्त्व असलेल्या भाज्या समाविष्ट करणं गरजेचं आहे. कारण रक्तातील साखर नियंत्रणात ठेवण्यासाठी जीवनसत्त्व खूप महत्त्वाची आहेत.

ब्रोकोली ही पौष्टिक भाजी आहे. विशेषत: या भाज्यांमध्ये लोह, फायबर, प्रथिने, कॅल्शियम, सेलेनियम आणि मॅग्नेशियम भरपूर प्रमाणात असते. त्यात व्हिटॅमिन के देखील मुबलक प्रमाणात असते. व्हिटॅमिन के मधुमेह असलेल्या रुग्णांमधील रक्तवहिन्यासंबंधी गुंतागुंत टाळते. हृदयाचे आरोग्य राखते.तसेच रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित ठेवते.

कोबीच्या पानांमध्ये मानवी आरोग्यासाठी आवश्यक असलेले सर्व पोषक घटक असतात. शिजवलेल्या कोबीच्या पानांमध्ये व्हिटॅमिन के भरपूर प्रमाणात असते. कोबीच्या पानात फायबर, प्रथिनांचे प्रमाण जास्त असल्याने पचनक्रिया सुधारते. आहारात कोबीच्या पानांचा समावेश करून रक्तातील साखरेची पातळी नियंत्रणात ठेवू शकतात.

लेट्यूसमध्ये मानवी शरीराला आवश्यक असलेले सर्व पोषक घटक असतात. उल्लेखनीय म्हणजे, या भाजीमध्ये व्हिटॅमिन के भरपूर प्रमाणात असते. तसेच या भाजीचा ग्लायसेमिक इंडेक्स खूप कमी असतो. त्यामुळे रक्तातील साखरेची पातळी वाढत नाही.

हिरव्या भाज्यांमध्ये कॅलरी कमी आणि पोषक तत्वे जास्त असतात. हिरव्या पालेभाज्यांमध्ये लोह, पोटॅशियम, मॅग्नेशियम, व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन बी, व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन के भरपूर असल्याने, ही हिरव्या पालेभाज्या मधुमेह असलेल्या लोकांसाठी उपयुक्त ठरते.

मेथीची पानांची कडू चव जरी कडू असली तरी ते आरोग्यवर्धक आहे. आरोग्यासाठी आवश्यक असलेले सर्व पोषक घटक यात असतात. आपल्या रोजच्या आहारात वापर केल्याने आपल्याला अनेक आरोग्यदायी फायदे मिळतात. यात फायबर, बीटा-कॅरोटीन, व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ए आणि व्हिटॅमिन के भरपूर असतात. हे मधुमेहाच्या रुग्णांमध्ये रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित ठेवण्यास मदत करते.

**क्लिक...क्लिक...!**



**पनवेल : उन्हाळी सुटी संपून शाळा कॉलेज सुरू होण्यास आता काही दिवसांचा कालावधी राहिला असल्याने बाजारपेठेमध्ये शालेय वस्तू खरेदीसाठी झुंबड उडत आहे.**

# देशाला एकसंघ ठेवण्याचे मोदीजींचे स्वप्न पूर्ण करूया

## केंद्रीय मंत्री प्रल्हाद सिंह पटेल यांचे महाडमध्ये आवाहन






**महाड : प्रतिनिधी**

देश एकसंघ रहावा यासाठी आपण सर्वांनी मिळून मोदीजींना साथ देऊया, असे आवाहन केंद्रीय मंत्री प्रल्हाद सिंह पटेल यांनी केले. भाजपाच्या 'मोदी @ ९' या अभियानांतर्गत संवाद यात्रेसाठी केंद्रीय मंत्री प्रल्हाद सिंह पटेल यांनी बुधवारी (दि. ७) महाड येथे भेट दिली. या वेळी ते बोलत होते.

भाजप ज्येष्ठ कार्यकर्तांच्या स्नेहमेळाव्यात पटेल यांनी, पंतप्रधान मोदी यांनी केलेल्या कामांचा व त्याचा गोरगरिबांना झालेल्या फायद्याची माहिती दिली. मोदीजींनी भारताला जगात अव्वल स्थान मिळवून दिले आहे, असेही या वेळी ते म्हणाले.

या वेळी महाराष्ट्र भाजप क्लस्टर संयोजक संजय टंडन, भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी या अभियानाची माहिती देत मंत्र्यांचे स्वागत केले. आमदार रविशेठ पाटील, माजी आमदार धैर्यशील पाटील, अतुल काळसेकर, बिपीन महामुणकर, अविनाश कोळी, हेमाताई मानकर, वैकुंठ पाटील, राजेश मपारा, मंजुषा कुद्रीमोती आदी उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पंतप्रधानपदाचा नऊ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झाला असून या ३० मे ते ३० जून हा 'मोदी @ ९' हे अभियान देशभर राबविले जात आहे. या अभियानासाठी केंद्रीयमंत्री प्रल्हाद सिंह पटेल हे मंगळवारी सायंकाळी महाड येथे आले. या वेळी त्यांनी कार्यकर्त्यांसोबत रात्रीचे जेवण केले. बुधवारी सकाळी त्यांनी महाडमधील काही प्रतिष्ठित व्यक्तींच्या गाठीभेटी घेतल्या. दरम्यान, त्यांनी संजय परांजपे यांच्या घरी जाऊन कुटुंबांशी वार्तालाप केला. भाजपच्या ज्येष्ठ कार्यकर्ते संवाद मेळाव्यात त्यांनी कार्यकर्तांचा सन्मान सत्कार करून त्यांचे आशीर्वाद घेतले.

पटेल म्हणाले की, मोदीजींनी गरीब आणि जनसामान्यांच्या योजना प्रभावीपणे राबविल्या. देश एक आणि अखंड व्हावा यासाठी ते सतत प्रयत्नशील आहेत. कलम ३७० हटले पाहिजे यासाठी मी विद्यार्थी जीवनात भाजपात आलो, पण आज समाधानी आहे. कोकणात भरपूर पाऊस पडतो मात्र पाण्याचा प्रश्न मिटत नाही. यावर जलप्रबंध योजनेतून काम होत आहे. जुने पाण्याचे स्त्रोत पुनर्विकसित केले जाणार आहेत.

क्लस्टर संयोजक संजय टंडन यांनी, राममंदिर बनेल का, हा प्रश्न प्रत्येक भारतीयाला पडला होता, मात्र मोदीजींनी या सर्व अशक्य गोष्टी शक्य करून दखवल्या. आपल्याला मोदीजींचे हे विषय मतदारांपर्यंत घेऊन जावे, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. अजय जोगळेकर यांनी केले.

# धाटाव औद्योगिक क्षेत्रातील आग दुसऱ्या दिवशीही धुमसतेय

**रोहे : प्रतिनिधी**

धाटाव औद्योगिक क्षेत्रातील रोहा डाय केम या कंपनीच्या गोडाऊन मध्ये साठवलेल्या कोळशाला बुधवारी आग लागली होती. बुधवारी अग्निशमन दलाच्या जवानांनी आग विझवण्यासाठी शर्तीचे प्रयत्न करून आग नियंत्रणात आणली होती, परंतु या गोडावून मधून निघत असलेला धुर दुसऱ्या दिवशीही धुमसत असल्याने धाटाव अग्नीशमन दलाचे जवान आग विझवण्याचे प्रयत्न करत होते.

धाटाव औद्योगिक क्षेत्रातील रोहा डाय केमच्या गोडाऊनला बुधवारी दुपारी आग लागली होती. या ठिकाणी कोळसा साठवून ठेवल्याने आग धुमसत होती. त्यामध्ये मध्यरात्री पुन्हा एकदा चार अग्निशमन दलाच्या बंबाना बोलाविण्यात आले असल्याची माहिती पोलिसांकडून मिळाली.

दरम्यान, गोडाऊन मध्ये लागलेली आग दुसऱ्या दिवशी धुमसत असल्याने धुर निघत असल्याने अग्निशमन दल व कारखान्यातील सुरक्षा विभाग अधिकारी लक्ष ठेवून उपायोजना करताना दिसत होते.

रोहा पोलीस ठाण्यात अकस्मीत आग लागल्याची नोंद करण्यात आली आहे, अशी माहिती रोहा पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर यांनी दिली आहे.

**रोहा डाय कंपनी मधील गोडावुन आगीची गंभीर दखल घेण्यात आली आहे. बुधवारी घटना घडताच अन्य बाजुच्या कारखान्यांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यामुळे घटनेची तीव्रता कमी करण्यात यश मिळाले. कोळसा व अन्य ज्वलनशील घटक असल्यामुळे अजूनही आग धुमसत आहे. परिस्थिती पुर्वपदावर येताच संपूर्ण चौकशी करत आगीचे कारण शोधून सुरक्षेच्या बाबतीत त्रूटी आढळल्यास कंपनी प्रशासनावर कारवाई करण्यात कोणतीही हयगय करण्यात येणार नाही.**

**–वि. वि. काटमवार, सहाय्यक संचालक, औद्योगिक आरोग्य व सुरक्षा**

# 'रोटरी'तर्फे कर्जतमध्ये कापडी पिशव्यांचे वाटप

**कर्जत : प्रतिनिधी**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून कर्जत रोटरी क्लबच्या वतीने शहरातील बाजारपेठेत एक हजार कापडी पिशव्यांचे वाटप केले. प्लास्टिक पिशव्यांचा वापर टाळा, पर्यावरणाचा समतोल राखा, असा संदेश यानिमित्ताने देण्यात आला.

कर्जत रोटरी क्लबचे अध्यक्ष सतीश श्रीखंडे, खजिनदार अरविंद जैन, माजी अध्यक्ष जितेंद्र ओसवाल, हुसेन जमाली, जितेंद्र परमार, डॉ. बी. एल. पाटील आदींनी जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून मुख्य बाजारपेठ, टिळक चौक, भाजी मार्केट आदी ठिकाणी जाऊन 'प्लास्टिक पिशव्यांचा वापर टाळा, कापडी पिशव्या वापरा व पर्यावरणाचा समतोल राखा' या उपक्रमाच्या माध्यमातून एक हजार कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले.

रोटरी क्लब पाणी टंचाई दूर व्हावी म्हणून बोअरवेल मारणे तसेच शैक्षणिक, आरोग्य विषयक असे अनेक उपक्रम राबवित असते. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी त्यांनी कापडी पिशव्यांचे वाटप केले.




महावितरण

## निविदा सूचना

अलिबाग विभागाअंतर्गत अलिबाग-२ उपविभागातील ग्राहकांचे रिडिंग घेणेसाठी, वीज देयके छपाई व वाटप करण्यासाठी नोंदणीकृत ठेकेदारांकडून ई-निविदा मागविण्यात येत आहेत त्याचा तपशील खालील प्रमाणे:

| निविदा क्रमांक | उपविभाग |
| --- | --- |
| बिलिंग/काअ/अलिबाग/टि-०५/०६/२०२३ | अलिबाग-२ |

अंदाज पत्रकीय रक्कम :- प्रत्येकी १६८.१० लाख निविदा भरण्याची अंतिम दिनांक:- २३/०६/२०२३ अधिक माहितीसाठी पुढील संकेत स्थळावर संपर्क साधावा.
https://etender.mahadiscom.in/eatApp/

**कार्यकारी अभियंता,**
**अलिबाग विभाग**

**PRO No.:- 1206 Dtd. 07/06/2023**


## ब्राह्मण मंडळातर्फे रविवारी आरोग्य शिबिर

**रोहे : प्रतिनिधी**

ब्राह्मण मंडळ रोहा यांच्या वतीने रौप्यमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून प्रिसटाईन आयुर इंडिया यांच्या सौजन्याने रविवारी (दि. ११) सकाळी १० ते दुपारी ३.३० या वेळेमध्ये श्री ओंकारेश्वर मंदिर रोहा येथे मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती ब्राह्मण मंडळ रोहा अध्यक्ष अमित आठवले यांनी दिली.

या शिबिरामध्ये जर्मन टेक्नोलॉजिद्वारे बनवण्यात आलेल्या अद्ययावत मशीनद्वारे मोफत आरोग्य तपासणी केली जाणार असून रुग्णांना आवश्यक ते समुपदेशनही केले जाणार आहे. हे शिबिर सगळ्यांसाठी खुले व मोफत असून परिसरातील नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन ब्राह्मण मंडळ रोहातर्फे करण्यात आले आह.

शिबिर यशस्वी होण्यासाठी ब्राह्मण मंडळ रोहा अध्यक्ष अमित आठवले, रौप्य महोत्सव समिती समन्वयक किशोर सोमण, शिबिर संयोजक विदुला परांजपे आदींसह ब्राह्मण मंडळ रोहा व रौप्यमहोत्सव समितीचे सर्व सदस्य विशेष परिश्रम घेत आहेत.

## शिवरायांचे कार्य अलौकिक –भिसे

**मुरूड : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज हे श्रीमंत योगी होते. त्यांचे कार्य अलौकिक होते, असे प्रतिपादन पुणे येथील शिवव्याख्याते निलेश भिसे यांनी केले.

मुरुड तालुक्यांतील खारअंबोली येथील शिवप्रेमी मंडळ व रणरागिणी महिला कलामंच यांचे संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५०व्या राज्याभिषेक सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमांत भिसे बोलत होते.

या वेळी शिवप्रेमी मंडळ अध्यक्ष चिंतामणी बेडेकर, मुरुड तालुका रा. स्व. संघ सहकार्यवाह प्रा. अनुपसिंह उपस्थित होते. निलेश भिसे पुढे म्हणाले की, छत्रपतींचा वारसा सांगत असताना युवा पिढीने आपली संस्कृती, सभ्यतेचा अभ्यास करावा आणि कुटुंब व्यवस्था सावरावी. लव जिहादसारखे प्रकरणे ग्रामीण भागात घडू नये म्हणून युवा पिढीचे प्रबोधन होणे गरजेचे आहे.


RSPM'S
Group of Schools Located in Navi Mumbai
(Kharghar, Papdichapada, Taloje, Koyanavele- Ghotcamp)
WALK-IN INTERVIEWS-2023-24
INVITES APPLICATION FOR THE FOLLOWING POST IN
Rahul Shikshan Prasarak Mandal's
State Board/CBSE Recognized Schools:

| Sr. No. | Name of Post | Numbers | Subject Specialization |
| --- | --- | --- | --- |
| 1 | Principal | 5 | - |
| 2 | Asst. Teachers in Primary and Secondary Section | 8 | English, Mathematics, Physics, Computer Science, Chemistry, Biology, Hindi, Social Science |
| 3 | Physical Teacher | 3 | B.P Ed Plus Sports Men |
| 4 | Music Teacher | | Sangeet Visharad |
| | Counsellor Wellness Teacher | | Clinical Psychologist |
| 5 | Gymnastics Coach | 3 | Kho-Kho, Kabbadi, Cricket, Other outdoor game Player |
| 6 | DTP/Computer Typist | 3 | Marathi and English |
| 7 | Security Officer | 3 | Retired Military Men |
| 8 | School Bus Driver | 3 | School Bus Experience |
| 9 | Peon | 5 | Reading Knowledge |
| 10 | Multipurpose Worker | | |

**Instruction :**
1) The above post are open to all, However, Reservation in Recruitment is as per Govt. rules.
2) Qualification, Experience and Salary are as prescribed by Govt. from time to time.
3) Candidates having fluent in spoken English and excellent subject knowledge holder only need to appear.
4) Submit the application along with a Xerox copy of the document. Originals will be verified at the time of the interview.
5) Experienced Teachers in CBSE Schools will be given preference.
6) Interested candidates may Present Personally for Walk-in-Interviews on Saturday, Sunday and Monday from 10th June to 12th June 2023 from 10 Am onwards at RSPM's Siddharth Multipurpose Residential School, Supparak Bhavan, Plot No. 52, Sector 19, Kharghar, Navi Mumbai
Dr. G. K. Dongargaonkar - Founder Secretary

Date: 08th June 2023

**sign/-**
**Secretary**
Rahul Shikshan Prasarak Mandal Supparak Bhavan,
Plot No. 52. Sector-19. Kharghar, Navi Mumbai
Mo. No. 9930958025



**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, अलिबाग सा.बां. विभाग,**
**अलिबाग पिन कोड ४०२ २०१**
ई–मेल पत्ता :– alibag.ee@mahapwd.com दुरध्वनी/फॅक्स क्रमांक :–(०२१४१) २२२०८४/२२५०९६
**ई–निविदा सूचना क्र. ०४ सन २०२३ २०२४ (फेरनिविदा)**

कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकामखात्या कडून नोंदणीकृत (पंजीकृत) कंत्राटदारांकडून खालील कामाकरीता ब–१ नमुन्यातील निविदा ई–निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत रुपये |
| --- | --- | --- |
| 1) | Construction of Concrete Road for Salav Murud Road. MSH-4 in Km. 267/550 to 267/950 near Nandgaon SBI ATM to Fish Market, Taluka Murud, Dist. Raigad. | 8430212.00 |
| 2) | Widening of Minor Bridge at Km. 1/350 on Hamarapur Dadar Vasheni Road. MDR-27. Taluka Pen, Dist.Raigad. | 7961966.00 |
| 3) | IMPROVEMENT AND SIDE SHOULDER, GUTTER AND RECONSTRUCTION OF CD WORK TO ALIBAG REWAS ROAD. M.S.H.4 IN KM.12/00 TO 18/400. TALUKA ALIBAG, DIST.RAIGAD. | 8190557.00 |

ई–निविदा उपलब्ध कालावधी :– दिनांक ०९/०६/२०२३ (स.१०.००) ते दिनांक १६/०६/२०२३ (सं.१८.०० )
ई–निविदा उघडणे :– दिनांक २०/०६/२०२३ (दु. ३.०० वा.) (कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग यांचे कार्यालयात)

खालील संकेतस्थळावर ई–निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. http://mahapwd.com
२. http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल . )
३. कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, अलिबाग कार्यालयातील सूचना फलक.

जा.क्र./सा.बां./अवि/निविदा/२७२५/२०२३
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां. विभाग, अलिबाग – ४०२ २०१
दिनांक :– ०१/०६/२०२३

**सही/–**
**(ज.ई. सुखदेवे)**
**कार्यकारी अभियंता,**
**सा.बां. विभाग, अलिबाग, जि. रायगड**



**उरण नगरपरिषद**
**निविदा सूचना**

जा.क्र. उनप/बांवि/ ६२८ / २०२३ २०२४
उरण नगरपरिषद,
उरण, दिनांक :– ८–६–२०२३

उरण नगरपरिषद खाली नमूद केलेल्या कामाकरिता नोंदणीकृत अथवा अनुभवी कंत्राटदारांकडून मोहरबंद निविदा मागवित आहे. निविदा दिनांक २६/०६/२०२३ रोजी सायं. ४.०० वाजेपर्यंतच्या मुदतीत मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद यांच्या नांवे दाखल करणेच्या आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम (रुपये) | इसारा रक्कम | सुरक्षा अनामत २% रोखीने | सुरक्षा अनामत ७% रोखीने | कामाची मुदत | निविदा फॉर्म फी रुपये |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| १ | उरण नगरपरिषद हद्दीतील उरण बोरी येथील श्री. प्रकाश रामचंद्र दैत यांच्या घरासमोर नवीन आर. सी. सी. गटार बांधणे. | रु.२,००,०००/– | रु.२,०००/– | रु.४,०००/– | रु.१४,०००/– | २५ दिवस | रु. ५००/– |

सदर कामाच्या अटी/शर्ती बांधकाम विभागातून माहितीकरिता उपलब्ध असून इच्छूक ठेकेदारांनी बांधकाम विभाग प्रमुख यांचेशी संपर्क साधावा.

**सही/–**
**(राहुल इंगळे)**
**मुख्याधिकारी**
**उरण नगरपरिषद**



**सिडको**
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

**(हक्कसोड पत्राबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **हक्कसोडपत्राची जाहीर सुचना.**

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | हक्क व हितसंबंध सोडून दिलेल्या व्यक्तीचे नाव | हक्क व हितसंबंध प्रदान दिलेल्या व्यक्तीचे नाव |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| ता. उरण, जि. रायगड | | | | | | | | |
| १. | भेंडखळ व बोकडविरा | १३२/८५ | १६६/३, १७०/२/बी व १/बी | ०–०९–९ | ३०० | भूखंड क्र. ३३, सेक्टर–१५, क्षेत्र–३०० चौ.मी. | श्रीमती चांगुणाबाई मोतीराम पाटील (हक्कसोडपत्र क्र. उरण ९१२/२०२३) | श्रीमती गौरी गिरीश नाईक |
| | | ५६/८७ | ६५/३ | ०–२३–० | | | | |
| | | एकुण | | ०–३२–९ | | | | |
| २. | | १४/१अ | | ०–१२–६ | १०० | भूखंड क्र. ११४, सेक्टर–५१, क्षेत्र–१०० चौ.मी. | | |
| ३. | | १३०/८७ | | १९/वगैरे | ४५० | भूखंड क्र. ७०, सेक्टर–५२, क्षेत्र–४५० चौ.मी. | श्रीमती चांगुणाबाई मोतीराम पाटील (हक्कसोडपत्र क्र. उरण ९१२/२०२३) | श्रीमती गौरी गिरीश नाईक |
| ४. | | १३३/८६–८६ | | १६६/४ | ४० | भूखंड क्र. ६०डी, सेक्टर–५२, क्षेत्र–४० चौ.मी. | | |
| | | एकुण पात्रता | | | ८९० | | | |
| ५. | भेंडखळ व बोकडविरा | १३२/८५ | १६६/३, १७०/२/बी व १/बी | ०–०९–९ | ३०० | भूखंड क्र. ३३, सेक्टर–१५, क्षेत्र–३०० चौ.मी. | १. श्रीमती बाबीबाई हिराजी पाटील १. श्री. दिलीप हिराजी पाटील ३. चंद्रकला रामदास पाटील ४. जितेंद्र रामदास पाटील ५. आशिष रामदास पाटील ६. तेजश्री धमेंद्र मढवी ७. सौ. बेबी नारायण भगत ८. श्रीमती मंदाकिनी पांडुरंग भोईर ९. श्रीमती वासंती विश्वनाथ मुंबईकर १०. श्रीमती शकुंतला जनार्दन पाटील (हक्कसोडपत्र क्र. उरण १०२१/२०२३) | १. श्री. चंद्रहास हिराजी पाटील २. सौ. निशा कमळाकर |
| | | ५६/८७ | ६५/३ | ०–२३–० | | | | |
| | | एकुण | | ०–३२–९ | | | | |
| ६. | | १४/१अ | | ०–१२–६ | १०० | भूखंड क्र. ११४, सेक्टर–५१, क्षेत्र–१०० चौ.मी. | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पूरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :– मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र. १०, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**सिडको/जनसंपर्क/१४०/२०२३–२४**

# भाजपसाठी ज्येष्ठ कार्यकर्त्यांचे त्याग आणि योगदान अमूल्य -आमदार गणेश नाईक




## नवी मुंबईमध्ये कार्यकर्त्यांशी हितगुज संवाद मेळावा

**नवी मुंबई : बातमीदार**

केंद्रातील भारतीय जनता पक्षाच्या लोककल्याणकारी सरकारला ३० मे रोजी नऊ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्त देशभर मोदी९ हे विशेष जनसंपर्क अभियान राबविण्यात येत आहे. या अंतर्गत ज्येष्ठ कार्यकर्त्यांबरोबर संवाद आणि हितगुज कार्यक्रमाचे आयोजन लोकनेते आमदार गणेश नाईक यांच्या वतीने ऐरोली विधानसभा मतदार संघासाठी बुधवारी (दि. ७) करण्यात आले होते.

कोपरखैरणे येथे झालेल्या या हृदयस्पर्शी मेळाव्याला पक्षाच्या ज्येष्ठ आणि जुन्या जाणत्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली. भाजपच्या आतापर्यंतच्या वाटचालीमध्ये आणि प्रगतीमध्ये पक्षाच्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा त्याग आणि योगदान अमूल्य आहे, असे प्रतिपादन या वेळी आमदार नाईक यांनी केले.

कोपरखैरणे येथील रा. फ. नाईक विद्यालयाच्या पटांगणावर हा संवाद मेळावा झाला. माजी आमदार संदीप नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली या मेळाव्याचे सुरेख आयोजन करण्यात आले होते. माजी खासदार डॉ. संजीव नाईक, माजी महापौर सागर नाईक, ज्येष्ठ कार्यकर्ते भगवानराव ढाकणे, गोपाळराव गायकवाड, श्री. शेरे, व्ही टी पाटील, श्रीरंग महाराज बोराडे, त्रिवेणी सालकर, ज्येष्ठ कार्यकर्ते अरुण पडते, मावळते महापौर जयवंत सुतार, माजी महापौर सुधाकर सोनवणे, माजी स्थायी समिती सभापती अनंत सुतार, माजी सभागृह नेते रवींद्र इथापे, माजी स्थायी समिती सभापती नवीन गवते, ज्येष्ठ माजी नगरसेविका कमल पाटील, माजी सभापती डॉक्टर जयाजी नाथ, माजी सभापती केशव म्हात्रे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला ओडिसा येथे झालेल्या दुर्दैवी रेल्वे अपघातातील मृत देशवासियांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. पंतप्रधान मोदी यांच्या काळात देशाने साधलेल्या विकासाची 'सेवा सुशासन, गरीब कल्याण' चित्रफित दाखविण्यात आली. आमदार नाईक यांनी मार्गदर्शन करताना ज्येष्ठ कार्यकर्त्यांबरोबर भावपूर्ण हितगुज साधले. एकेकाळी दोन खासदारांचा पक्ष असलेला भाजप आज दुसऱ्या कार्यकाळात देशामध्ये पूर्ण बहुमताने सत्तेमध्ये आहे. देशातील अर्ध्याहून अधिक राज्यांमध्ये भाजपाची तसेच भाजप व सहयोगी पक्षांची सत्ता आहे. भाजपच्या या नेत्र दीपक यशामध्ये या पक्षाचा पाया मजबूत करणाऱ्या आणि पक्ष संघटन बलशाली करण्यासाठी आयुष्यभर कष्ट घेणाऱ्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांचे योगदान नेहमीच स्मरणार्थ राहील, असे सांगितले. भाजपमध्ये निरपेक्ष वृत्तीने कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांची आणि मार्गदर्शन करणाऱ्या बुद्धिवंतांची फौज असून संघ विचारांचे पाठबळ आहे. पंतप्रधान मोदी यांनी महिला, युवक, ज्येष्ठ, आदिवासी, बहुजन, वंचित देशातील सर्वच घटकांसाठी लोककल्याणकारी योजना यशस्वीपणे राबवून या सर्वांच्या जीवनामध्ये आनंद आणि सुख समाधान निर्माण केलेले आहे. मेळाव्याला उपस्थित काही जेष्ठ कार्यकर्त्यांनी प्रतिनिधिक स्वरूपात आपले मनोगत या वेळी व्यक्त केले. व्ही. टी. पाटील यांनी पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली सशक्त भारताची निर्मिती होत असल्याचे मत मांडले. लोकनेते नाईक हे नवी मुंबईच्या विकासाचे शिल्पकार असून आमच्यासारखे जेष्ठ कार्यकर्ते त्याचे साक्षीदार असल्याचे श्री. पाटील म्हणाले. लोकनेते नाईक आणि नवी मुंबई हे समीकरण केवळ महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण देशामध्ये सुपरिचित आहे.

श्रीरंग महाराज बोराडे यांनी लोकनेते नाईक यांच्या विचारानुसार आजही या वयात आमची रात्रंदिवस कार्य करण्याची तयारी असल्याचे स्पष्ट केले.

### पंतप्रधान मोदींच्या कणखर नेतृत्वामुळे भारताचा सन्मान

*माजी खासदार डॉक्टर संजीव नाईक यांनी कार्यक्रमाचे प्रस्ताविक करताना पंतप्रधान मोदी यांच्या कणखर नेतृत्वामुळे जगात भारताचा सन्मान वाढल्याचे नमूद केले. जी ट्वेंटी राष्ट्रसंघाचे अध्यक्ष पद, देशाच्या अमृत महोत्सवी स्वातंत्र्य वर्षात देशाला अर्पण केलेली संसदेची नवीन भव्य-दिव्य वास्तू अशा अनेक अभिमानास्पद बाबी आहेत. पंतप्रधान मोदी यांनी 'सबका साथ; सबका विकास' धोरणांतर्गत देशातील सर्व घटकांना न्याय दिलेला आहे.*

# शिरवणेतील दूषित पाणीपुरवठ्याची पाहणी

## नेरूळ विभाग अधिकारांचा दौरा; भाजपच्या मागणीची दखल



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

शिरवणे गाव येथील रहिवाशांना मागील एक महिन्यांपासून कमी दाबाने पाणी पुरवठा होत आहे, त्यातच मागील पंधरा दिवसापासून दत्त कृपा रहिवाशी संघ तसेच मारवाडी चाल येथील रहिवाशी यांना येणारे पाणी दूषित व गढूळ असल्याने नागरिकांत संतप्त भावना व्यक्त होत होत्या. त्या पार्श्वभूमीवर मागील २२ मे रोजी शिरवणे गाव सेक्टर एक परिसराचा पावसाळी पूर्वीचा प्रभागाचा पाहणी दौरा करावा, असे निवेदन माजी नगरसेविका माधुरी जयेंद्र सुतार यांनी ब विभाग अधिकारी नेरूळ प्रबोधन मवाळे यांना दिले होते

या अनुषंगाने माजी नगरसेविका माधुरी सुतार यांनी पुनश्य पाहणी दौरा करून या नागरिकांच्या तक्रारी सोडवाव्यात, अशी मागणी धरून ठेवली. त्या विषयानुसार विभागीय अधिकारी प्रबोधन मवाळे यांनी ७ जून रोजी सरप्राईज विजिट सदर भागामध्ये केली व तेथील नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. प्रत्यक्ष दर्शनी त्या भागातील सर्व नाले पूर्णतः भरलेले असल्यामुळे सांडपाण्याची समस्या त्याचबरोबर पिण्याच्या पाण्याची ही तक्रार जास्त असल्याची दिसून आले संबंधित विभागाचे अधिकारी, कर्मचारी व ठेकेदार यांना तत्काळ तेथे बोलून त्याबाबत जाब विचारला

सर्व तक्रारदाराची येत्या दोन दिवसांत दूषित पाण्याची समस्या निवारण्यात येईल आणि स्वच्छ पाणी येईल, असे त्यांनी आश्वासन दिले आहे.

# इंडोर स्टेडियमसाठी वास्तुविशारद नेमणूक करण्याची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

सीवूड्स सेक्टर ५० येथील भूखंड क्र २ वर सिविक सेंटर तथा इंडोर स्टेडियम उभारणी करावी त्यासाठी वास्तू वास्तुविशारद नियुक्त करावा, अशी मागणी माजी नगरसेवक विशाल डोळस यांनी नवी मुंबई मनपा आयुक्त राजेश नार्वेकर यांच्याकडे केली आहे.

आमदार गणेश नाईक यांच्या नेतत्वाखाली नवी मुंबई महानगर पालिकेचे आयुक्त राजेश नार्वे कर यांच्या सोबत नवी मुंबईतील विविध समस्या बाबत झालेल्या बैठकीत माजी नगरसेवक विशाल डोळस यांनी सीवूड्स येथे विविध नागरी सुविधा नसल्याचे आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या निदर्शनास आणून दिले यात मनपा स्थापन झाल्यापासून या ठिकाणी क्रीडाप्रेमी सीविक सेंटर तथा इन्डोर स्टेडियम उभारणीसाठी सातत्याने मागणी करत असल्याचे सांगितले. या ठिकाणी निर्माण होणाऱ्या इंडोर स्टेडियमसाठी वास्तुविशारदची नेमणूक करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.



गेली अनेक वर्ष हा भूखंड जैसे थे स्थितीत असून सिडकोची ना हरकत नसल्याने हा विषय प्रलंबित राहिला होता, परंतु जेव्हापासून नवी मुंबई महापालिकेचा विकास आराखडा प्रसिद्ध झाला आहे. त्यामध्ये या भूखंडावर सिविक सेंटरसाठी रिझर्वेशन केल्यामुळे ना हरकतचा विषय आता संपुष्टात आलेला आहे.त्यामुळे या भूखंडावर आता सिविक सेंटर उभारणीची अडचण दूर झाली आहे. त्यासाठी आता वास्तुविशारदची नेमणुक करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

## निवडक


### आग लागल्याने वाहतूक टप्पा



**नवी मुंबई :** हार्बर रेल्वे मार्गाच्या ट्रान्स हार्बर मार्गावर जुईनगर-नेरूळ स्थानकांदरम्यान इलेक्ट्रिक बॉक्सला आग लागल्याची घटना घडली होती. बुधवारी सकाळी शॉर्टसर्किटमुळे ही आग लागली, मात्र तातडीने ती आग विझवण्यात आली. आगीमुळे काही काळ वाहतूक ठप्प झाली होती. त्यामुळे हार्बर मार्गावर एकच गोंधळ उडाला होता. प्लॅटफॉर्म गर्दीने भरून गेले होते. आगीमुळे परिसरातील झुडपे आणि गवतही पेटले होते. सुदैवाने आग वेळीच आटोक्यात आणण्यात यश मिळाले. या घटनेनंतर हार्बर रेल्वेसेवेवरही त्याचा परिणाम झालेला पाहायला मिळाला कारण, आग विझवल्यानंतरही सुरक्षेच्या कारणास्तव जवळपास वीस मिनिटं वाहतूक थांबवण्यात आली होती.

### वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रम


**उरण :** आगरी, कोळी, कराडी संघर्ष समितीचे महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष तथा रायगड भूषण भारत भोपी यांनी



वाढदिवसानिमित्त वृद्धाश्रमात चादर, टॉवेल त्याचबरोबर फळे वाटप केली. वृक्षारोपणही केले. सांगरोली येथील जनाधर्म आधार गृह, नेरे येथील स्नेहबंध वृद्धाश्रम, मानघर येथील करुणेश्वर वृद्धाश्रम, चिंचवली मोरबे येथील वासल्य वृद्धाश्रम रीटघर येथील शिवाश्रय वृद्धाश्रम या ठिकाणी असलेल्या वृद्धाश्रमात जन्मदिवस साजरा केला. या वेळी सनीप कलोते, साईनाथ भोपी, यशवंत भिडे, विनायक शिंदे ,राजू मुंबईकर, संदेश घरत ,नरेश भोपी तसेच आदिवासी बांधव, त्यांची लहान मुले आणि भारत भोपी यांचे सहकारी मित्र मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### महागणपतीच्या दर्शनासाठी गर्दी

**उरण :** तालुक्यातील चिरनेर तीर्थक्षेत्रात संकष्टी चतुर्थी निमित्ताने बुधवारी (दि. ७) हजारो गणेश भक्तांनी उन्हाची तमा न बाळगता प्राचीन जागृत श्री



महागणपतीच्या दर्शनाचा लाभ घेतला. दर्शनासाठी आलेल्या विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मंडळींचे चिरनेर गणपती देवस्थानतर्फे श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले. विशेष म्हणजे श्री महागणपतीच्या जागृत देवस्थानामुळे दर महिन्याला चिरनेर आणि परिसरातील असंख्य नागरिकांना रोजगाराची चांगली संधी मिळाली आहे.

# एनआरआयच्या घनकचरा प्रकल्पाची आयुक्तांकडून पाहणी

**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छ सर्वेक्षणामध्ये घरातूनच ओला, सुका व घरगुती घातक अशा तीन प्रकारे कचरा वर्गीकरण करण्यात येत आहे त्याचप्रमाणे दररोज १०० मेट्रीक टनाहून अधिक कचरा निर्माण करणाऱ्या मोठ्या संस्था, सोसायट्या, हॉटेल्स यांनी आपल्या ओल्या कचऱ्यावर आपल्याच आवारात प्रक्रिया करणे घनकचरा व्यवस्थापन अधिनियमानुसार आवश्यक असून त्याकडेही विशेष लक्ष दिले जात आहे.



या अनुषंगाने नवी मुंबई महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्यामार्फत स्वच्छता कार्यवाहीकडे विशेष लक्ष दिले जात असून नुकतीच आयुक्तांनी स्वच्छताविषयक आढावा बैठक घेऊन प्रत्येक घटकाने स्वच्छता मोहिमेला अधिक वेग देण्याचे निर्देश दिले होते. यादृष्टीने प्रत्येक विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी तसेच विभागनिहाय नियुक्त विभागप्रमुख दर्जाचे नोडल अधिकारी यांनी आपापल्या क्षेत्राचा नियमित पाहणी दौरा करून स्वच्छतेमध्ये जाणवणाऱ्या त्रुटी संबंधितांच्या निदर्शनास आणून देऊन त्याचे त्वरीत निराकरण करण्याबाबत सूचना आयुक्तांनी दिल्या होत्या.

यासोबतच स्वत: आयुक्त राजेश नार्वेकर यांच्यामार्फतही विविध विभागांतील स्वच्छतेची प्रत्यक्ष पाहणी केली जात आहे. यानुसार आयुक्तांनी आज स्वच्छ सर्वेक्षणाच्या सिटी प्रोफाईलमध्ये असलेल्या मोठ्या प्रमाणावर कचरा निर्मिती होणाऱ्या एनआरआय कॉम्प्लेक्स फेज २ मधील सीवूड इस्टेट सोसायटीला अचानक भेट देत तेथील कचरा विल्हेवाट प्रकल्पाची पाहणी केली. या वेळी त्यांच्या समवेत घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. बाबासाहेब राजळे, बेलापूर विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी शशिकांत तांडेल, मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र सोनावणे व इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

एनआरआय कॉम्प्लेक्स ही नवी मुंबई क्षेत्रातील अतिशय मोठी सोसायटी असून येथील फेज २ मध्ये ५०० कि.ग्रॅ. क्षमतेची कंपोस्ट पीट्स बनविण्यात आली आहेत. सोसायटीमधून दररोज संकलीत होणारा ओला कचरा पीट्समध्ये टाकला जात असून त्यापासून खत निर्मिती करण्यात येत आहे. दररोजच्या सरासरी ४०० कि. ग्रॅ. ओल्या कचऱ्यापासून निर्माण होणारे खत सोसायटीच्या आवारातील उद्यान व हिरवाई विकसित करण्यासाठी वापरले जात असून त्यामुळे कचऱ्याची निर्मितीच्या ठिकाणी विल्हेवाट लावली जाते व कचरा वाहतूक खर्चात बचत होते.

### रहिवाश्यांसोबतही संवाद

ओल्या कचऱ्यापासून होणाऱ्या खत निर्मितीची संपूर्ण प्रक्रिया आयुक्त महोदयांनी समजून घेतली व सोसायटीमध्ये दैनंदिन निर्माण होणाऱ्या ओल्या व सुक्या कचऱ्याचे तपशील तपासले. सोसायटीतील रहिवाशांशी संवाद साधून कचरा वर्गीकरण व कचऱ्याची विल्हेवाट सोसायटीच्या आवारातच लावण्याचे अत्यंत चांगले काम आपण करीत आहात, अशी प्रशंसा केली. स्वच्छता ही नियमित करण्याची गोष्ट असल्याने हे सातत्य आपण असेच टिकवून ठेवावे, असे आवाहन आयुक्तांनी या वेळी रहिवाशांना केले.

# आदिवासी शेतकरी बांधवांना भाजीपाला, भात बियाणे वाटप



**पनवेल : वार्ताहर**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून आलकार्गो लॉजिस्टिक लिमिटेडच्या माध्यमातून पनवेल तालुक्यातील लहान धामणी, मोठी धामणी, औशाची वाडी येथील आदिवासी शेतकऱ्यांना भाजीपाला व भात बियाणे वाटप करण्यात आले.

ऑलकार्गो लॉजिस्टिक लिमिटेड आणि सावली संस्था यांच्या माध्यमातून आदिवासी शेतकऱ्यांना नेहमी फायदा होतोय. आता पर्यंत कंपनीच्या माध्यमातून फळझाडे, घरकुल, करोना काळातील अन्नधान्य वाटप केले आहेत. या सारखे अनेक समाज उपयोगी कार्यक्रम हाती घेतले आहे. त्यामुळे आपल्या आदिवासी बांधवानी ऑलकार्गो लॉजिस्टिक लिमिटेड आणि सावली संस्था यांना सहकार्य करावे, असे आवाहन आदिवासी ठाकूर संघटनेचे पनवेल तालुका अध्यक्ष सिताराम चौधरी यांनी आदिवासी बांधवाना केले आहे. तसेच भात बियाणे वाटपाच्या कार्यक्रमात उपस्थित प्रमुख पाहुण्याने आपले मनोगत व्यक्त केले.

या वेळी ऑलकार्गो लॉजिस्टिक लिमिटेड सी. एस. आर. मॅनेजर नितीन कांबळे, सावली संस्था अध्यक्ष विजय घोलप, सचिव तथा समाजविकास अधिकारी शांताराम माने, प्रकल्प समन्वक बाबुराव शेंडगे, आदिवासी ठाकूर समाज संघटनेचे पनवेल तालुक्याचे कार्यकर्ते पोलीस पदु दोरे, आदिवासी सम्राटचे संपादक गणपत वारगडा, ग्रामपंचयात सदस्य जनार्दन निरगुडा, समाजसेवक संजय चौधरी, समाजिक कार्यकर्ते बाळू चौधरी, गणेश शिद, शनिवार वाघ आदी. कार्यकर्ते उपस्थित होते.

# प्रथम येणाऱ्या गायत्री योगीचा सत्कार

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका संचलित राजर्षी छत्रपती शाहू महाराज विद्यालय आंबेडकर नगर रवाळे नवी मुंबईची विद्यार्थिनी गायत्री मनोज कुमार योगी हीने ९३.८० टक्के गुण मिळवून संपूर्ण नवी मुंबई मनपा शाळेमध्ये प्रथम येण्याचा मान मिळवला.



त्याबद्दल तिचे पेढा भरऊन अभिनंदन करताना शाळेचे मुख्याध्यापक अमोल खरसंबळे ज्येष्ठ शिक्षक राजू राठोड, अमोलकुमार वाघमारे, दिलीप निंबारा, विजय चौरे, शिल्पा टिकले हे सहकारी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी दीपक चाबुकस्वार, शशी रणखांबे, द्वारका वाघे या वेळी उपस्थित होते.

यावर्षीचा शाळेचा निकाल हा ९६.१० टक्के इतका चांगला लागला असून आत्तापर्यंतच्या इतिहासातील हा सर्वात चांगला निकाल आहे. यानंतर गुनानुक्रमे दवितिय क्रमांक पवनकुमार उमाशंकर यादव ९३.४० टक्के, तृतीय क्रमांक नीतू लालचंद यादव, ९३.२० टक्के चतुर्थ क्रमांक रीता धवल भंडारी ९३ टक्के, पाचवा क्रमांक राज राकेश शर्मा ९०.४० टक्के असे आहेत. परीक्षेला बसलेल्या ४६२ विद्यार्थ्यांपैकी ४४४ विद्यार्थी पास झालेले आहेत.

शाळेचा निकाल उत्तम लागण्यामध्ये शाळेच्या शिक्षकांचे मोलाचे योगदान आहे. माजी महापौर सुधाकर सोनवणे, रंजना सोनवणे, आयुक्त राजेश नार्वेकर, उपायुक्त योगेश कुडुसकर, शिक्षणाधिकारी अरुणा यादव, विस्तारधिकारी माधुरी नारखेडे यांनीही शाळेच्या उत्तम निकालाबद्दल विद्यार्थी, मुख्याध्यापक, शिक्षक व पालकांचे हार्दिक अभिनंदन व कौतुक केले.

कला, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या शाहू महाराज विद्यालयाने आता शैक्षणिक गुणवत्तेतही आपली चुनुक दाखविली आहे.

## निवडक

### अलिबाग येथे रक्तदान शिबिर



**अलिबाग** : बँक ऑफ इंडिया ऑफिस असोसिएशनतर्फे मुंबई व गोवा यूनिट यांच्या स्थापना दिवसानिमित्त अलिबाग येथे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. रक्तदान शिबिराचे उद्घाटन बँक ऑफ इंडिया रायगड विभागाचे प्रमुख मुकेश कुमार, उपप्रमुख जॉन लोबो व बँक ऑफ इंडिया ऑफिस असोशियसनचे असिस्टंट जनरल सेक्रेटरी अजय सावंत यांच्या हस्ते करण्यात आले. जिल्हा रुग्णालयमार्फत झालेल्या या शिबिरास बँकेचे अग्रणी जिल्हा प्रबंधक विजयकुमार कुलकर्णी व अधिकारी संघटनेचे कमिटी मेंबर कालिदास माने यांची प्रमुख उपस्थिती होती. जिल्ह्यातील बँक अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही रक्तदान केले.

### उद्योजकता जागृती कार्यक्रम

**अलिबाग** : राष्ट्रीय महिला आयोग पुरस्कृत व भारतीय उद्योजकता विकास संस्था अहमदाबाद, प्रकल्प कार्यालय अलिबागतर्फे १५ जून रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मुख्य कार्यालय येथे महिलांकरिता उद्योजकता जागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रवेश मर्यादित असून पूर्व नोंदणी करणे आवश्यक आहे. या कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी कोणतेही अट नाही. या कार्यक्रमाच्या अधिक माहितीसाठी शशिकांत दनोरीकर (मो.७७७५८०२४९७) प्रकल्प अधिकारी, भारतीय उद्योजकता विकास संस्था (ईडीआयआय) मधुकुंज बिल्डिंग, पहिला माळा, एसटी स्टँड समोर अलिबाग येथे संपर्क साधावा, असे आवाहन प्रकल्प अधिकारी, भारतीय उद्योजकता विकास संस्था शशिकांत दनोरीकरांनी केले आहे.

### 'विद्यार्थ्यांनी ऑफलाईन अर्ज सादर करावे'

**अलिबाग** : सन २०१८-१९पासून महाडीबीटी प्रणालीमार्फत मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे. पोर्टलवर अर्ज करताना येणाऱ्या विविध अडचणींचा सामना विद्यार्थ्यांना करावा लागत आहे. अनेक पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळाला नाही. त्यामुळे २०१८-१९ ते २०२१-२२ या कालावधीतील शिष्यवृत्ती, फ्रिशीप योजनेंतर्गत प्रलंबित अर्ज निकाली काढण्यासाठी विद्यार्थ्यांनी ऑफलाईन अर्ज आपल्या संबंधित महाविद्यालयास १५ जूनपर्यंत जमा करावयाचे आहेत. विद्यार्थ्यांनी वेळेत ऑफलाईन अर्ज महाविद्यालयात जमा करावयाचे असून ते अर्ज महाविद्यालयाने २० जूनपर्यंत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयाकडे सादर करावयाचे आहेत, असे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण सुनील जाधव यांनी कळविले आहे.

# पोलादपूरकरांना पावसाची प्रतीक्षा

## ■ १२ गावे, ३० वाड्यांना तीन टँकरने पाणीपुरवठा



**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील पाणीटंचाई आराखड्याच्या अंमलबजावणीच्या शेवटच्या टप्प्यामध्ये उन्हाळ्याच्या झळा तीव्र झाल्या आहेत. तालुक्यातील १२ गावे व ३० वाड्यांना तीन टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. त्यामुळे पोलादपूरकर आता चातकाप्रमाणे पावसाची प्रतीक्षा करीत आहेत.

तालुक्यातील बाळमाची, आंबेमाची, कुडपण खुर्द, नाणेघोळ, बोरावळे, चांभारगणी बुद्रुक, खडकवणे, गोलदरा, गोळेगणी, मोरगिरी, किनेश्वरगाव कुंभळवणे, तुटवली आदी महसुली गावे आणि कामथे फौजदारवाडी, महालगूर मोरेवाडी, कातळी कामतवाडी, क्षेत्रपाळ धनगरवाडी आणि क्षेत्रपाळ कामतवाडी या १२ गावांतून टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचे प्रस्ताव आले आहेत. यानंतर जून २०२३च्या पहिल्या आठवड्यात चांभारगणी बुद्रुक आणि किनेश्वर या गांवांना तसेच कालवली गावातील पाटीलवाडी, पवारवाडी, भोसलेवाडी, मोहल्ला, बौध्दवाडी, विठ्ठलवाडी आणि किनेश्वर पेढावाडी आणि तुटवली गळतीची वाडी, धामणदिवी भरणेची वाडी, महालगूर मोरेवाडी, बोरावळे कोडबेकोंड, वडघर पेढावाडी, वडघर सणसवाडी, वडघर फौजदारवाडी, नावाळे शेदवाडी, कातळी दत्तवाडी, आडावळे खडकवाडी, बोरघर महादेवाचा मुरा, कोतवाल खुर्द बागवाडी, रेववाडी, बेलाची वाडी, भोगाव पार्टेवाडी, साखर रिंगेवाडी, कापडे खुर्द राखीचा टोक, क्षेत्रपाळ आमलेवाडी, क्षेत्रपाळ धनगर वाडी, तुटवली धनगरवाडी या १२ गावे आणि ३० वाड्यांतील एकूण चार हजार ७२१ लोकसंख्येला आणि एक हजार ३८२ पशुधनासाठी पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

टँकरद्वारे साठवण टाकी, तलाव तसेच विहिरींमध्ये एक दिवसाआड पाणी टाकले जात आहे. सुरुवातीला पाच हजार लिटर साठवण क्षमतेच्या टँकरने पाणीपुरवठा केला जात होता. आता दुर्गम भागामध्ये तीन हजार लिटर तर रस्त्यालगतच्या गावांतील टंचाई निवारणासाठी १२ हजार लिटर साठवण क्षमतेचा एक असे एकूण तीन टँकर पाणीटंचाई तैनात करण्यात आले आहेत.

**खासगी जागेतून पाणी अधिग्रहण**

**रानबाजिरे एमआयडीसीच्या धरणातील पाणी टँकरद्वारे पुरवठ्यासाठी उपलब्ध होत नसल्याने यंदा लोहारे येथील बागडे फार्महाऊस येथे पाण्याचे खासगी अधिग्रहण करण्यात येऊन टँकर भरून पाणीपुरवठा करण्यात येत असल्याची माहिती पोलादपूर पंचायत समितीचे अभियंता कांबळे यांनी दिली.**

## झेप शिक्षणाची अभियानांतर्गत शिक्षण व बालविवाहाबाबत जनजागृती

**पेण : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात कोरोना काळानंतर आदिवासी मुलांच्या शिक्षणात खूप अनियमितता आली होती. त्यामुळेच झेप शिक्षणाची या अभियानांतर्गत अंकुर आश्रममध्ये आदिवासी, ठाकर व धनगर जमातीच्या मुलांसाठी नवे मार्ग शोधण्याची गरज असल्याची माहिती ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या डॉ. वैशाली पाटील यांनी दिली. या अभियानात सहभागी स्वयंसेवक व आदिवासी समाजातील युवकांना तरणखोप पेण येथे त्या संबोधित करीत होत्या.



राज्यातील डोंगराळ व दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी, ठाकर व धनगर विद्यार्थ्यांना आश्रम शाळेच्या माध्यमातून शिक्षणाच्या संधी उपलब्ध झाली आहेत. या अभियानामध्ये मुलींना जास्तीत जास्त प्राधान्य देण्यात आले आहे.

या अभियानादरम्यान ३१ वाड्यांमध्ये आदिवासी, ठाकर व धनगर या जमातीतील मुलांसाठी कार्यशाळा घेण्यात आल्या. त्यामध्ये खेळ, दृकश्राव्याच्या माध्यमातून शिक्षणाचे महत्त्व पटवून सांगण्यात आले. या वेळी वाड्यांवर मुलांसोबत खेळ घेण्यात आले. झेप शिक्षणाची अभियान सुमारे १५ दिवस राबविण्यात आले.

हे अभियान यशस्वीपणे पार पाडण्यासाठी राजभाऊ पाटील, मिनल सांडे, समाजसेवा विद्यार्थी फ्रान्सिसको रॉड्रिंक्स, तृप्ती धुरी व प्रतिक्षा पोपकर यांचा समावेश होता. याबाबत आपले निरीक्षण नोंदविताना अंकुर टीमने सांगितले की, कातकरी महिला स्वतः निरक्षर असल्यातरी आपल्या मुलांनी शिक्षण घ्यावे या बाबत पुरूषांपेक्षाही जास्त आग्रही होत्या.

## जिते येथे २७० एमएलडी क्षमतेचे जलप्रक्रिया केंद्र

### व्हीव्हीएबीएजी-सिडको यांच्यात करार

**पेण : रामप्रहर वृत्त**

व्हीए टेक डब्ल्यूएबीएजी (व्हीव्हीएबीएजी) या प्युअर-प्ले जल तंत्रज्ञान क्षेत्रातील समुहाने सिडकोसाठी पेण तालुक्यातील जिते येथे प्रतिदिवस २७० दशलक्ष लिटर (एमएलडी) एवढ्या क्षमतेच्या जलप्रक्रिया केंद्राची रचना, बांधकाम व कार्यान्वयनाचा करार केला आहे.

नवी मुंबईतील भविष्यकाळातील पाण्याची मागणी पूर्ण करण्याच्या दृष्टीने ह्या प्रकल्पाचे नियोजन करण्यात आले आहे. हेटवणे धरणातील पाण्यावर प्रस्तावित २७० एमएलडी क्षमतेने प्रक्रिया केली जाणार आहे आणि या पाण्याचे पम्पिंग करून ते सध्या अस्तित्वात असलेल्या विहाल येथील मास्टर बॅलन्सिंग रिझर्व्हॉयरमध्ये (जलाशय) पुढील वितरणासाठी आणले जाणार आहे. या प्रकल्पाच्या व्याप्तीमध्ये, २७० एमएलडी क्षमतेच्या जलप्रक्रिया प्लांटची रचना, इंजिनीअरिंग, पुरवठा, बांधकाम, स्थापना व हस्तांतर यांचा समावेश होतो. हा प्रकल्प कामाला आरंभ झाल्यापासून ४२ महिन्यांत पूर्ण होणे अपेक्षित आहे आणि त्यानंतर कार्यान्वयन व देखभाल कालावधी १५ वर्षांचा आहे. अधिक घनतेचा घनकचरा काढून टाकण्यासाठी या प्लांटमध्ये उच्च दर्जाचे क्लॅरिफायर्स वापरले जातील. त्यानंतर रॅपिड ग्रॅव्हिटी सॅण्ड फिल्टर्सद्वारे पाण्यावर प्रक्रिया केली जाईल आणि क्लोरीनच्या मदतीने पाणी निर्जंतुक केले जाईल.

व्हीए टेक डब्ल्यूएबीएजीच्या इंडिया क्लस्टरचे मुख्य कार्यकारी अधिकारी शैलेश कुमार म्हणाले, आमच्यासाठी हे महत्त्वाचे व धोरणात्मक यश आहे. सिडकोने आमच्यावर दाखवलेल्या विश्वासाबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर या भागातील पाण्याची वाढती मागणी पूर्ण करण्यात मदत होईल आणि आमच्या प्रवासातीलही तो महत्त्वाचा संदर्भ ठरेल.

## शिवराज्याभिषेक दिनानिमित्त विविध कार्यक्रम

**अलिबाग : प्रतिनिधी**

अखंड हिंदुस्थान अणि स्वराज्याचे संस्थापक श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचा ३५०वा शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त अलिबाग शहरामध्ये मंगळवारी (दि. ६) अखिल भारतीय विद्यार्थी परिषद अणि मंगलमूर्ती वाद्य पथक यांच्या संयुक्त विद्यमाने विविध कार्यक्रम साजरे करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात महाराजांना पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर शिवाजी चौकात मशाली पेटवण्यात आल्या. मंगलमूर्ती वाद्य पथक यांनी ढोल व ताशा वादन केले, तसेच जय हनुमान लाठी काठी पथक, भोनंग यांनी लाठी काठी व मर्दानी खेळांचे प्रदर्शन केले.

छत्रपती शिवाजी महाराज या विषायावर अलिबागचा बाल मावळा कैवल्य म्हात्रे यांनी व्याख्यान सादर केले. मुंबई विद्यापीठामध्ये सुवर्ण पदक विजेते श्रीराम ठोसर यांनी महाराजांवर व्याख्यान दिले. अक्षय म्हात्रे यांचे स्ट्रींग फॅमिली या संगीत संचाने सूर मराठी मातीचा उत्सव शिव स्वराज्याचा हा संगीत व बहारदार गीत कार्यक्रम सादर केला. या कार्यक्रमात शिवाजी महाराजांवर महाराजांवर विविध गीत व पोवाडे गायले गेले.

या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी अखिल भारतीय विद्यार्थी परिषद अणि मंगलमूर्ती वाद्य पथकाचे सुलदिप नाईक, यश म्हात्रे, अभाविप जिल्हा संयोजक वैष्णव देशमुख, प्रल्हाद, अमेय जाधव, प्राथम घोडींदे यांनी परिश्रम घेतले.





**चौक : आषाढी एकादशीनिमित्त रायगडच्या वारकऱ्यांनी पायी वारी करीत तिर्थक्षेत्र पंढरपूरकडे रथासह प्रस्थान केले आहे. शेकडो वर्षांपासूनची वारीची परंपरा आजही जपली जाते. अतिशय कडक उन्हात देव पांडुरंगावर श्रद्धा ठेऊन हे वारकरी दरमजल करीत २८ जून रोजी पंढरपूर नगरीत प्रवेश करतील.** (छाया : अर्जुन कदम)

## अदानी फाउंडेशन माध्यमातून वृक्ष लागवड

**मुरूड : प्रतिनिधी**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून अदानी फाउंडेशनमार्फत सोमवारी (दि. ५) सावर्डे गावामध्ये वृक्षलागवड करण्यात आली. सुमारे पाचशेहून अधिक फळझाडे या वेळी लावण्यात आली.

त्याचप्रमाणे लाभार्थी शेतकऱ्यांना जॉबकार्ड काढून देण्यात आले असून मनरेगा योजनेंतर्गत लाभार्थी शेतकऱ्यांना लाभ देण्यात येणार आहे.

वृक्षलागवडीचा शुभारंभ सावर्डे येथे लाभार्थी मनीष सावंत यांच्या शेतात दिघी पोर्टचे पर्यावरण व सुरक्षा विभागाचे प्रमुख विलास शिर्के व इंजिनिअरिंग विभागाचे प्रमुख चिराग भिमानी यांच्या हस्ते वृक्ष लागवड करण्यात आली. या कार्यक्रमाचे नियोजन आदानी फाउंडेशनचे अवधूत पाटील यांनी केले. झाडे लावण्यासाठी लोकांना शासन व अदानी ग्रुपमार्फत प्रोत्साहित केले जात असल्याची माहिती प्रकल्प अधिकारी जयश्री काळे यांनी दिली.



## घरी जाताना दप्तर ठेवा शाळेतच

### दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी माथेरानमधील शाळेचा उपक्रम

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

सेंट फ्रान्सिस झेवियर हायस्कूलच्या नवीन मुख्याध्यापक सिसिलिया परेरा यांनी शाळेतील पहिल्या दोन दिवसांतच शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांना दप्तराचे ओझे घेऊन येताना विद्यार्थ्यांची त्याचप्रमाणे पालकांची होणारी दमछाक पाहून सर्व वर्गासाठी दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी वेगळीच शक्कल अंमलात आणली आहे.

दरदिवशी एकाच विषयाचा गृहपाठ असणार आहे अणि त्याच विषयाचे नोटबूक घरी घेऊन न्यायचे. बाकी सर्व दप्तर हे शाळेत (वर्गातच) राहणार आहे. त्याची सर्व जबाबदारी शाळेची असणार आहे, तर विषयांचा अभ्यासक्रम विद्यार्थीकडून पूर्ण करून घेण्याची जबाबदारी शाळेने घेतली आहे. महत्त्वाचे दप्तराचे ओझे कमी होणार असल्याने पालक व विद्यार्थी खुश झाले आहेत.



**आमच्या मुलांचे दप्तराचे ओझे रोज दोन ते तीन किमी शाळेत घेऊन जाताना व दुपारी परत घरी आणताना खूपच हाल होत होते. शाळेतून दप्तराचे ओझे कमी करण्याचा स्तुत्य उपक्रम सुरू केला असल्याने मुलांना शाळेत सोडण्यासाठी, आणण्यासाठी जाण्याची गरज लागणार नाही. शाळेच्या हा निर्णयाचे कोणालाही बंधन नसल्याने आम्ही निर्णयाचे स्वागत करतो.**

**-निकिता देशमुख, पालक**

**विद्यार्थ्यांना ई-रिक्षेअभावी दप्तराचे ओझे घेऊन रोज तीन किमी पायपीट करावी लागते. नवीन मुख्याधिपिकांच्या ही गोष्ट निदर्शनास येताच त्यांनी मुलांना दप्तर शाळेतच ठेवण्याची व्यवस्था केली आहे. अभ्यासाला लागतील तेवढीच वह्या, पुस्तके घरी न्यायची. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.**

**-योगेश जाधव, शिक्षक**

## शिवीगाळी व मारहाणप्रकरणी आरोपीवर गुन्हा दाखल

**माणगाव : प्रतिनिधी**

शिवीगाळी व मारहाण केल्याप्रकरणी आरोपीवर माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना बुधवारी (दि. ७) दुपारी १.३० वाजण्याच्या सुमारास कालवण गावात घडली. याबाबतची फिर्याद चंद्रशेखर सुरेश साळवी (वय ३२, रा. कालवण बौद्धवाडी) यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.

माणगाव पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी कि, आरोपी किरण राजेंद्र साळवी (वय ३२ रा. कालवण बौद्धवाडी) याला दारू पिण्याचे व्यसन असून तो बुधवारी आरोपी किरण साळवी हा त्याच्या पत्नीला दारूच्या नशेत मारहाण करीत होता. तेव्हा फिर्यादी चंद्रशेखर सुरेश साळवी व जखमी झालेले राजेंद्र सीताराम साळवी यांनी त्या दोघांची भांडणे सोडवून आरोपीला घराचे बाहेर अंगणात घेऊन आले असता आरोपीने फिर्यादीला शिवीगाळी केली. फिर्यादी आरोपीला शांत राहा असे बोलले असता आरोपीने फिर्यादीला तसेच आरोपीचे वडील राजेंद्र साळवी यांनाही मारून दुखापत केली. घटनेचा अधिक तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार रावसाहेब कोळेकर हे करीत आहेत.

## रावे गावात दोन हजार मच्छरदाणीचे वाटप

**पेण : रामप्रहर वृत्त**

आमदार रविशेठ पाटील यांचे गाव असलेले रावे गावात एकूण २००० मच्छरदाणीचे वाटप माजी जिल्हा परिषद सदस्य कौशल्या पाटील व भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी बलवलीचे उपसरपंच विजय पाटील, रावे गावातील प्रतिष्ठित व्यक्ती ग्रामपंचायत सदस्य व रावे गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. भाजप जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांनी सांगितले की, रावे गावात रविशेठ पाटील यांनी विकासाची गंगा आणली आहे. कोणीतरी येऊन आम्ही गावचा विकास करू अशा भूलथापा नागरिकांना देतात, परंतु येथील नागरिक सुज्ञ आहेत ते अशा बोलथापांना बळी पडणार नाही. गावातील नागरिक रविशेठ पाटील यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहतील.

माजी जिल्हा परिषद सदस्य कौशल्य पाटील यांनीही सांगितले की, रावेगावचा विकास आमदार रविशेठ पाटील यांनीच केला आहे. त्यामुळे रावे गावातील नागरिकांनी रविशेठ पाटील व वैकुंठ पाटील यांच्या मागे खंबीरपणे उभे राहून त्यांचे हात मजबूत करू, असे आवाहन केले.



### जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धा

# दुसऱ्या दिवशी भारताचे वर्चस्व

**लंडन : वृत्तसंस्था**

भारतीय गोलंदाजांनी जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या (डब्ल्यूटीसी) दुसऱ्या दिवशीच्या पहिल्या सत्रावर आपले वर्चस्व निर्माण केले. भारतीय गोलंदाजांनी या सत्रात ऑस्ट्रेलियाच्या चार विकेट्स घेतल्या, तर कांगारूंना या सत्रात २४ षटकांत फक्त ६५ धावा करता आल्या. लंचसाठी खेळ थांबला त्या वेळी ऑस्ट्रेलियाच्या सात बाद ४२२ धावा झाल्या होत्या. अ‍ॅलेक्स कॅरी २२ तर पॅट कमिन्स दोन धावा करून नाबाद होते.



भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पहिल्या दिवशी बुधवारी भारताने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. खेळपट्टीवर हिरवे गवत पाहून रोहित शर्माने गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारताच्या दृष्टीने पहिला एक तास हा चांगला होता, बॉल स्विंग होत होता, कांगारूंच्या फलंदाजांची भंबेरी उडत होती. सत्राच्या सुरुवातीला उस्मान ख्वाजाला मोहम्मद सिराजने बाद केले. या विकेटव्यतिरिक्त भारताला दुसरी विकेट मिळवण्यासाठी लंचपर्यंत वाट पहावी लागली. मधल्या काळात संथ सुरुवात करणाऱ्या वॉर्नरने मार्नसच्या साथीने डाव सावरला. अखेर ही जोडी शार्दुलने फोडली मात्र तोपर्यंत दिवसाचे एक सत्र संपले होते.

ऑस्ट्रेलियाने पहिल्या दिवशीच्या तीन बाद ३२७ धावांच्या पुढे खेळण्यास सुरूवात केली. स्टीव्ह स्मिथने दिवसाच्या पहिल्याच षटकाच्या पहिल्या दोन चेंडूवर चौकार मारत आपले शतक पूर्ण केले. या चौकारांमुळे ऑस्ट्रेलिया पहिल्या दिवसाप्रमाणे याही दिवशी वर्चस्व गाजवणार असे वाटते होते. त्यात ट्रेविस हेडने आपले दीडशतक पूर्ण केले.

स्मिथ-हेड जोडी भारताला दुसऱ्या दिवशीही सतावणार असे वाटत असतानाच सिराजने ट्रेविस हेडला १६३ धावांवर बाद करीत ही जोडी फोडली. त्यानंतर आलेल्या कॅमरून ग्रीनला शमीने सहा धावांवर बाद करत कांगारूंचा पाचवा फलंदाज माघारी धाडला.

भारताने जरी पाठोपाठ दोन विकेट घेतल्या असल्या तरी स्मिथ अजून क्रिजवर होता. ऑस्ट्रेलिया ४००च्या जवळ पोहचत होती. स्टीव्ह स्मिथ १२१ धावा करून मोठी खेळी करण्याच्या इराद्यात होता, मात्र लॉर्ड शार्दुलने त्याचा त्रिफळा उडवत भारताला मोठा दिलासा दिला. यानंतर अक्षरने मिचेल स्टार्कला ५ धावांवर धावबाद करत कांगारूंना लंचपूर्वी सातवा धक्का दिला.

## नेमबाज धनुष श्रीकांतचा सुवर्णवेध

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय नेमबाज धनुष श्रीकांतने ज्युनियर विश्वचषक स्पर्धेत सुवर्णपदक पटकाविले आहे. त्याला पुरुषांच्या १० मीटर एअर रायफल प्रकारात हे यश मिळाले. श्रीकांतने भारताला तिसरे सुवर्ण मिळवून दिले.

श्रीकांतच्या सुवर्णपदकानंतर भारताच्या पदकतालिकेत एकूण नऊ पदके झाली आहेत. भारतीय संघाच्या वाट्यामध्ये तीन सुवर्ण, चार रौप्य आणि दोन कांस्यपदकांचा समावेश आहे. भारतीय संघ गुणतालिकेत अव्वल, तर अमेरिका एकूण सहा पदकांसह दुसऱ्या स्थानावर आहे.




धनुष श्रीकांतने जर्मनीतील सुहल येथे झालेल्या ज्युनियर नेमबाजी विश्वचषकाच्या १० मीटर एअर रायफल प्रकारात २४९.४ गुण नोंदवले, तर स्वीडनच्या रौप्यपदक विजेत्या पोंटस कालिनने २४८.१ आणि कांस्यपदकविजेत्या फ्रान्सच्या रोमेन ऑफ्रेरेने २२७.१ गुण मिळवले.

## कार्लोस अल्काराझची उपांत्य फेरीत धडक

**पॅरीस : वृत्तसंस्था**

स्पेनचा युवा खेळाडू कार्लोस अल्काराझ याने फ्रेंच ओपन टेनिस ग्रँडस्लॅम पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. अल्काराझसमोर आता नोवाक जोकोविचचे आव्हान असणार आहे.

अल्काराझने टेनिस कोर्टवर अप्रतिम खेळ केला. त्याने पहिला सेट ६-२ असा जिंकत आघाडी घेतली. दुसऱ्या सेटमध्येही त्सित्सिपास याला झोकात पुनरागमन करता आले नाही. अल्काराझ याने दुसरा सेट ६-१ असा जिंकत विजय मिळवण्याच्या दिशेने वाटचाल केली.

## अभिनंदन!



**पनवेल :** महाराष्ट्र शासनाच्या वतीने रायगड जिल्हा परिषद नियोजन समितीच्या विशेष निमंत्रित सदस्यपदी भाजपचे अरुणशेठ भगत यांची नियुक्ती झाली आहे. त्यानिमित्त त्यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्या अंतर्गत मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात कोळी समाज नेते विश्वनाथ कोळी, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, माजी उपसरपंच रमेश पाटील, भाजप ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, संतोष शेळके, सतीश मालुसरे, प्रवीण पालव, अशोक पवार, रवींद्र पाटील, शत्रुघ्न उसाटकर, विश्वजीत पाटील, अनिल कोकाटे यांच्यासह अन्य भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी अरुणशेठ भगत यांची भेट घेत पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.













## महाराष्ट्र कबड्डी निवड चाचणी स्पर्धेचे ठिकाण निश्चित

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनने आपल्या सर्व गटाच्या निवड चाचणी कबड्डी स्पर्धांचे ठिकाण जाहीर केले. वरिष्ठ गटाची स्पर्धा पुण्यात, तर कुमार गटाची ठाण्यात घेण्यास कार्यकारिणी समितीने मंजुरी दिली.

महाराष्ट्रात प्रो-कबड्डीमुळे तरुणाई कबड्डी या खेळाकडे आकर्षित होऊ लागली आहे. त्यामुळे दिवसेंदिवस खेळाडूंची संख्या वाढत आहे. त्या खेळाडूंना खेळण्याची संधी उपलब्ध व्हावी म्हणून महाराष्ट्रातील अ व ब दर्जा असणाऱ्या महानगर पालिकेच्या हद्दीतील खेळाडूंना संधी उपलब्ध करून देण्याचा मानस संघटनेचे अध्यक्ष अजित पवार यांनी व्यक्त केला होता. त्यास मंजुरी देण्यात येऊन त्याकरिता नियमावली तयार करण्याकरिता कमिटी गठित करण्यात आली. यामुळे पुण्यातून दोन तसेच उपनगर, ठाणे, नाशिक या जिल्ह्यातून प्रत्येकी एक असे पाच संघ जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत वाढण्याची शक्यता आहे.

## आंतर हॉस्पिटल डबल विकेटमध्ये सुशांत-रोहित जोडी अजिंक्य

**मुंबई : प्रतिनिधी**

आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी व आयडियल ग्रुपतर्फे शिवाजी पार्क मैदानामध्ये झालेल्या उपांत्य फेरीत सुशांत-रोहित जोडीने जे. जे. हॉस्पिटलच्या सुभाष शिवगण व नरेश शिवतरकर जोडीला अवघ्या एका धावेने चकविले. सेव्हन हिल्स हॉस्पिटलचे सुशांत गुरव व रोहित सोमार्डे जोडीने आंतर हॉस्पिटल डबल विकेट क्रिकेट स्पर्धेच्या विजेतेपदाचा डॉ. जगन्नाथराव हेगडे वाढदिवस चषक जिंकला.

रोहित सोमार्डेच्या प्रभावी गोलंदाजीवर तीनदा बाद झाल्यामुळे प्रतिस्पर्धी ज्ञानेश्वर साळुंखे व रतिन मोरे जोडीला ११ धावांचे विजयी लक्ष्य कठीण झाले. परिणामी सुशांत-रोहित जोडीने सात धावांनी विजय मिळवीत अजिंक्यपदाला गवसणी घातली. लायन्स क्लब इंटरनॅशनल-मुंबईचे डीस्ट्रीक्ट गव्हर्नर डॉ. जगन्नाथराव हेगडे, ब्रीच कॅन्डी हॉस्पिटलचे फायनान्स डायरेक्टर सतीश श्रॉफ व शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण यांनी विजेत्या-उपविजेत्यांना पुरस्कार देऊन गौरविले.

प्रतिस्पर्ध्यांच्या १३ धावांचा पाठलाग करताना सुभाष-नरेश जोडीने पहिल्या षटकात दमदार फलंदाजी केली,



परंतु रोहित सोमार्डेच्या गोलंदाजीवर एकदा बाद झाल्यामुळे सुभाष-नरेश जोडीला पराभव पत्करावा लागला.

दुसऱ्या उपांत्य सामन्यात सेव्हन हिल्स हॉस्पिटलच्या ज्ञानेश्वर साळुंखे व रतिन मोरे जोडीने सुरज जाधव व अफझल शेख जोडीवर १०-८ अशा धावांनी विजय मिळविला. अफझल शेखने तीन चौकार ठोकून विजयाचे संकेत दिल्यानंतर पुढील चेंडूवर तीनदा बाद झाला. त्यामुळे त्यांना पराभवास सामोरे जावे लागले.













दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com